# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १४ मार्च, २०१८ / फाल्गुन २३, १९३९ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) गृहनिर्माण मंत्री**<br>**(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७३**

---

### मुंबई महानगरपालिकेच्या मैदानांचे भाडे वाढविण्यात आल्याबाबत

**(१) * ३८६११ श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विविध ठिकाणी असलेल्या महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मैदानांचे क्रीडा स्पर्धांच्या वापराकरिता आकारण्यात येणारे भाडे अधिक प्रमाणात वाढविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विलेपार्ले (पूर्व) येथील विलेपार्ले कल्चरल सेंटर या संस्थेमार्फत नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धांसाठी महानगरपालिकेच्या तेथील दुभाषी मैदानाच्या वापराकरिता महानगरपालिकेने एका दिवसाकरिता रुपये २७ हजार इतके भाडे आकारण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी याच मैदानाच्या वापराकरिता एका दिवसाकरिता केवळ एक हजार रुपये भाडे आकारण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाकरिता महानगरपालिकेकडून कोणत्या आधारावर इतके भाडे आकारण्यात येत आहे,

(५) असल्यास, अशा प्रकारे संस्थांकडून क्रीडा स्पर्धांचे आयोजन वाढविण्यासाठी तसेच राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी महापालिकेमार्फत वाढविण्यात आलेले मैदानाचे भाडे कमी करण्यासाठी शासनाने महानगरपालिकेला निर्देश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मुंबईतील विविध ठिकाणी असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मैदानांचे क्रीडा स्पर्धेच्या वापराकरिता महानगरपालिकेच्या दिनांक १८/०३/२०१३ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे एक दिवसासाठी रुपये १०००/- इतके भाडे आकारले जात होते.

तथापि, महानगरपालिकेच्या दिनांक ०२/११/२०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार, सदर मैदानांच्या वापराकरिता एक दिवसासाठी रुपये २७,०००/- इतके भाडे आकारणी करण्यात येत होती.

(५) व (६) क्रिडा स्पर्धेचे आयोजन वाढविण्यासाठी व राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी सदर परिपत्रकात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुधारणा करण्यात आली असून, दिनांक १९/०१/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार, दिनांक १८/०३/२०१३ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे, महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मैदानांवर क्रीडा स्पर्धेच्या वापराकरिता एक दिवसासाठी रुपये १०००/- इतके भाडे आकारणी करण्यात येत आहे.

-----------------

## कफपरेड (मुंबई) येथील जाधवजी मेन्शन इमारतीच्या पुनर्विकासात म्हाडाने नियमांचे उल्लंघन केल्याबाबत

**(२) * ३८३२० श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कफपरेड येथे इमारत क्र. ३/४४ जाधवजी मेन्शन या उपकर प्राप्त इमारतीचा पुनर्विकास होत असताना म्हाडाने नियमांचे उल्लंघन करुन विकासकाला डी.सी.आर ३३/६ अन्वये परवानगी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहर परिसर तसेच जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील भूकंपग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३) * ३८९३६ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरापासून ४० ते ५० किलोमीटरच्या परिघात दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास ३.२ इतक्या रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाच्या धक्क्यांची नोंद झाली असून जव्हार (जि.पालघर) तालुक्यात दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास तसेच महिनाभरापासून भूकंपाचे धक्के वारंवार बसत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धक्क्यामुळे अनेक गावांतील घरांना तडे गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत नुकसानीची पहाणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, ज्या घरांचे नुकसान झाले आहे त्यांना शासनाकडून कोणती आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) नाशिकपासून ६४ कि.मी. अंतरावर दिनांक २५/१२/२०१७ रोजी ३.२ रिश्टर स्केल महत्ता असलेला भूकंपाचा धक्का बसला होता. पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात भुकंपाचे ४ सौम्य धक्के बसले होते. त्यापैकी दिनांक २५/१२/२०१७ रोजी ३.४ व दिनांक ०२/०१/२०१८ रोजी ३.२ रिश्टर स्केल अशी धक्यांच्या तिव्रतेची नोंद झाली होती.

(२) नाशिक जिल्ह्यात अशी बाब नाही. जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील काही गावांतील घरांना तडे गेले आहेत.

(३) होय.

(४) ज्या घरांचे नुकसान झाले आहे त्यांना मदत देण्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून विभागीय आयुक्त, कोकण यांना निधी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) निदेशकांच्या प्रलंबित मागण्या निकाली काढण्याबाबत

**(४) * ३९०७० प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) निदेशकांच्या प्रलंबित मागण्या निकाली काढण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनात केलेल्या १३ मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांच्या मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक १८/१२/२०१७ रोजी नागपूर येथे मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे अध्यक्षतेखाली बैठक झाली. सदर बैठकीमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांच्या मागण्यांसंदर्भात नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याबाबत

**(५) * ३७७७२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०८८ ला दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून वगळण्यात आलेल्या २७ गावांना पुन:श्च दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास अधिकृतरित्या समाविष्ट करण्याबाबतचा आदेश काढून शासनाने या गावांचा समावेश उक्त महानगरपालिकेत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू २७ गावांतील नागरिकांनी मागील अनेक वर्षापासून वेळोवेळी आंदोलने करून शासन निर्णयास प्रखर विरोध केल्यामुळे या २७ गावांतील जनमताचा आदर करून मा.मुख्यमंत्री यांनी २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद होण्यासाठी फेरविचारांती दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास नवीन आदेश काढले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशाला निवडणूक आयोगाने हरकत घेतल्याने तो रद्द करण्यात येऊन मा.मुख्यमंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ व माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान या २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कार्यक्रमात घोषित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या जाहीर घोषणेनंतर अद्याप स्वतंत्र नगरपरिषदेबाबत कोणतीही कार्यवाही न करता सदरहू २७ गावांपैकी १० गावांमध्ये ग्रोथ सेंटर उभारण्याच्यादृष्टीने तेथील नागरिकांना विश्वासात न घेता अंमलबजावणी करण्याबाबत शासनस्तरावर प्रयत्न सुरु असल्याने विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडे दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ व दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास तसेच मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ व दिनांक ६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, स्थानिक नागरिकांनी त्यांना विविध अडचणी व गैरसोय निर्माण होत असल्याने मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागील २ ते ३ वर्षांपासून स्वतंत्र नगरपरिषदेची सातत्याने केलेल्या मागणीनुसार उक्त २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) शासन अधिसूचना, दिनांक १४/०५/२०१५ अन्वये कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रात दिनांक ०१ जून, २०१५ पासून २७ गावांचा समावेश करण्यात आला आहे.
(२) व (३) दिनांक ०७ सप्टेंबर, २०१५ रोजी उक्त २७ गावांसाठी नगरपरिषद गठित करण्यासाठी प्रारूप अधिसूचनेचा मसूदा प्रसिध्द केला आहे.

सदर २७ गावांची नगरपरिषद स्थापन करण्यासाठी प्राप्त हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) व (५) २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रामधील कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील १० गावांमधील सुमारे १०८९ हेक्टर या ग्रोथ सेंटरच्या क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची “विशेष नियोजन प्राधिकरण” म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सर्व पक्षीय युवा मोर्चा कल्याण यांनी दिनांक २७/०२/२०१७ व १२/०४/२०१७ च्या पत्रान्वये शासन अधिसूचना दिनांक ०७/०९/२०१५ नुसार नागरिकांच्या प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांची प्रक्रिया सुरू करण्याचे निवेदन दिले आहे.

उपरोक्त नमूद २७ गावांची नगरपरिषद स्थापन करण्यासाठी प्राप्त हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडून अहवाल प्राप्त झालेनंतर शासनस्तरावरून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सायबर गुन्हयांना आळा घालण्याबाबत

**(६) * ३७७५६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.परिणय फुके, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गुन्हेगारीच्या सन २०१६ च्या अहवालानुसार २३८० सायबर गुन्हे घडल्याची बाब निदर्शनास आली असून सर्वाधिक गुन्हे मुंबई, पुणे व औरंगाबाद या शहरात घडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या काही वर्षांमध्ये नोंद झालेल्या सायबर गुन्ह्यांपैकी अतिशय अल्प म्हणजे १ टक्क्यापेक्षाही कमी गुन्ह्यांमध्ये आरोपींना शिक्षा झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात सायबर गुन्हयांचे प्रमाण वाढले असून सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणते धोरण आखले आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. सदरहू माहिती महाराष्ट्रातील गुन्हे, सन २०१६ या वार्षिक पुस्तकात प्रसिद्ध करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही. सन २०१२ ते २०१७ या वर्षात दाखल गुन्ह्यांचे आणि दोषसिद्धीचे तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Cyber crime registered under I.T. Act, 2000, I.T. Act read with IPC & Special Law Cases | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Disposal by Court | | | |
| Year | No. of cases registered | Detected cases | % of detection | No. of accused arrested | Trials completed | No. of cases convicted | No. of Acquittals | Conviction % |
| 2012 | 561 | 351 | 62.57 | 407 | 40 | 8 | 32 | 20.00 |
| 2013 | 907 | 562 | 61.96 | 603 | 52 | 10 | 42 | 19.23 |
| 2014 | 1879 | 786 | 41.83 | 942 | 59 | 15 | 44 | 25.42 |
| 2015 | 2195 | 777 | 35.40 | 825 | 54 | 22 | 32 | 40.74 |
| 2016 | 2380 | 791 | 33.24 | 1009 | 17 | 4 | 13 | 23.53 |
| 2017 | 4035 | 1037 | 25.70 | 1367 | 12 | 2 | 10 | 16.67 |

(३) राज्यात सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी “महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प” राबविण्यात येत आहे. शासनाने विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर, मुंबई यांचे अधिपत्याखाली स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

प्रकल्पाच्या प्रथम टप्प्यात राज्यातील सर्व जिल्हा/आयुक्तालयात मिळून ४७ ठिकाणी सायबर लॅब कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. सदर सायबर लॅब यांना तपासणीसाठी आधुनिक यंत्रसामुग्री पुरविण्यात येत आहे. सायबर गुन्ह्यांची उकल व सायबर तंत्रज्ञानाची तंत्रज्ञानाबाबत १३८ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी शहरातील वाढीव पाणीपुरवठा योजनेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(७) * ३८४७६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेतील विविध गैरप्रकारास व अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी, यंत्रणा व कंत्राटदार यांच्याविरूध्द कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, परभणी महानगरपालिका यांना पाणीपुरवठा विभागाचे सहसचिव श्री.जाधव यांनी माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहसचिव यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे आयुक्त, परभणी महानगरपालिका यांनी चौकशी करुन पाणीपुरवठा योजनेत गैरप्रकार करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी, यंत्रणा व कंत्राटदार यांचेविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत परभणी शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पाबाबत लोकप्रतिनिधींकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार प्रकल्पातील अनियमिततेच्या अनुषंगाने त्यास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी करण्याच्या सूचना जुलै, २०१७ मध्ये आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना देण्यात आल्या आहेत.

तसेच पूर्ण झालेल्या कामाची जलदाब चाचणी संबंधित कंत्राटादाराच्या खर्चातून पूर्ण करण्याच्या सूचना परभणी महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) सदर प्रकल्पातील अनियमिततेस जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्या विभागीय चौकशीबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने आवश्यक अभिलेख परभणी महानगरपालिकेकडून उपलब्ध करुन घेतले असून दोषारोप निश्चितीची कार्यवाही संचालनालयाकडून करण्यात येत आहे.

तसेच झालेल्या कामाची जलदाब चाचणी कंत्राटदाराकडून करुन घेण्याची कार्यवाही परभणी महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

**(८) * ३८१७० श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील, श्री.आनंदराव पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५१२९ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आय.टी.आय.) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गत अनेक वर्षांपासून केवळ रुपये चाळीस विद्यावेतन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या महागाईच्या काळात सदर विद्यावेतन अतिअल्प असल्याने विद्यार्थ्यांकडून विद्यावेतनात वाढ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनस्तरावर विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(४) असल्यास, प्रस्तूत प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील एकूण प्रशिक्षणार्थ्यांपैकी आर्थिकदृष्टया मागास असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ४०/- तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ६०/- याप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील एकूण प्रशिक्षणार्थ्यांपैकी आर्थिकदृष्टया मागास असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ४०/- तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ६०/- याप्रमाणे देण्यात येत असलेल्या विद्यावेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव अद्यापि शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथील एस.आर.ए सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदस्यांना विकासकाकडून धमकाविले जात असल्याबाबत

**(९) * ३८५४७ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील अंधेरी येथील अण्णानगर, शिवशक्ती, विठ्ठल रुक्मिणी आणि अंधेरी कासमनगर या सोसायट्यांच्या पुनर्विकासासाठी मे.के.एस. चमणकर व भागीदार एल.ॲण्ड.टी कंपनीची एस.आर.ए प्रकल्पांतर्गत सन १९९९ नियुक्ती करण्यात आली होती, परंतू दिलेल्या मुदतीत सभासदांना घरे उपलब्ध करुन देण्यास मे.के.एस.चमणकर अपयशी ठरल्याने चमणकर व एल.ॲण्ड.टी कंपनीला या प्रकल्पातून हटविण्यात आल्याने उपरोक्त सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदस्यांना व स्थानिक झोपडपट्टीवासियांना एल.ॲण्ड.टी कंपनीला विकासक म्हणून निवडण्यासाठी काही गुंडांकडून विविध

आमिषाबरोबर धमक्याही दिला जात असल्याची तक्रार मा.मुख्यमंत्री व मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त तक्रारीनुसार शासनाने चौकशी करुन अशा घटनांना वेळीच आळा घालण्यासाठी दोन्ही कंपन्यांचे राज्यातील प्रकल्प त्वरीत बंद करुन अन्य कंपन्यांना देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) प्रस्तुत प्रकरणी अंधेरी अण्णानगर शिवशक्ती (एस.आर.ए.) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांचा दिनांक २९/१२/२०१७ चा तक्रार अर्ज पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सदर तक्रार अर्जातील अर्जदार व विरोधक यांच्यात एस.आर.ए. च्या संबंधाने वाद असून सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून अर्जदार व विरोधक यांना अंबोली पोलीस ठाणे येथे बोलावून वारंवार मिटींग घेण्यात आलेल्या आहेत. तसेच विभागामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये व शांतता अबाधित रहावी याकरीता अर्जदार व विरोधकांना फौ.प्र.सं. १९७३ चे कलम १४९ अन्वये शांततेचा भंग न करण्याबाबत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे, सदर भागात पोलिसांची गस्त वाढवण्यात आलेली आहे. तसेच, अर्जदार यांना धमकी देणेप्रकरणी अंबोली पोलीस ठाणे येथे दिनांक ०५/०१/२०१८ रोजी अदखलपात्र गुन्हा नोंद क्र. ४९/२०१८, भा.दं.वि. कलम ५०४, ५०६, अन्वये नोंद करण्यात आला आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. आणि पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम १३ (२) अंतर्गत सदर विकासकाची नियुक्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने रद्द केली आहे. शिखर तक्रार निवारण समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी/झोपुप्रा यांचे विकासक नियुक्ती रद्द बाबतचे आदेश कायम केले आहे. विकासकाने सदर आदेशाच्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर येथील डम्पिंग ग्राऊंडमध्ये वारंवार आग लागत असल्याबाबत

**(१०) * ३८८४१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथील कॅम्प नंबर पाच परिसरात असलेल्या आकाश कॉलनी परिसरातील डम्पिंग ग्राऊंडमध्ये दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास आग लागून त्यातून निघणाऱ्या धुरामुळे परिसरातील नागरिकांना श्वसनाचा त्रास झाल्याच्या तक्रारी नागरिकांनी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका व स्थानिक जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे केल्या असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर व अंबरनाथ येथील कारखान्यांमधून निघणारा कागदी कचरा देखील या डम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकण्यात येत असून त्यामुळे वारंवार आग लागण्याचे प्रमाण वाढत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) उल्हासनगर येथील कॅम्प नंबर पाच परिसरात दुर्गंधी व धूर येत असल्याने तेथील खडी मशीन भूखंडावर घनकचरा टाकण्यास बंदी करण्याची मागणी स्थानिक नागरिक व विविध राजकीय पक्षांनी लेखी निवेदने व मोर्चाद्वारे केली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर डम्पिंग ग्राऊंडवर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा टाकण्यात येत असून, सदर ठिकाणी तापमान वाढीमुळे तुरळक प्रमाणात आगी लागतात, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर महानगरपालिकेच्या रुग्णालयात डॉक्टर व अन्य महत्वाची पदे रिक्त असल्याबाबत

**(११) * ३८८८१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेच्या रुग्णालयात डॉक्टर व अन्य महत्वाची १७५ पदे रिक्त असल्याने रुग्णांना आरोग्य सेवा वेळेवर व नियमित मिळत नसल्याने रुग्णांमध्ये असंतोष पसरला असूनही महानगरपालिका रिक्त जागा भरण्यास टाळाटाळ करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टर व अन्य रिक्त असलेली पदे भरण्याबाबत तसेच रिक्त पदे भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित दोषी महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१) सोलापूर महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली १३ दवाखाने (फक्त बाहय रुग्ण विभाग), ८ प्रसूतीगृहे, १४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र (UPHC) व १ संसर्गजन्य रोगाचे रुग्णालय (IDH) आहे. त्यामध्ये महत्वाच्या पदांवरील मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| पद | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वैद्यकिय अधिकारी | ६० | ४२ | १८ |
| मिडवाईफ (ANM) | १४६ | १०४ | ४२ |
| स्टाफ नर्स | २२ | २२ | -- |
| मेट्रन | १० | ९ | १ |
| फार्मासिस्ट | ४३ | २९ | १४ |
| लॅब टेक्निशियन | १२ | १२ | -- |
| एकूण | २९३ | २१८ | ७५ |

वर नमूद केल्याप्रमाणे २९३ पदांपैकी २१८ पदे भरण्यात आली असून महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना सर्व सुविधा समाधानकारकपणे पुरविण्यात येत असून रुग्णांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील धर्मादाय रुग्णालये गरीब रुग्णांना उपचार नाकारत असल्याबाबत

**(१२) * ३९०२३ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पंचतारांकित धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्याकडे असलेल्या खाटांपैकी १० टक्के खाटा गरीब रुग्णांवर मोफत उपचारासाठी राखीव ठेवण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले असून तद्‌नंतरही काही मोठया रुग्णालयांकडून गरीब रुग्णांवर मोफत उपचार करण्यास टाळाटाळ केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे किती रुग्णालये अशा सेवा पुरवितात व या सेवा न पुरविणाऱ्या किती रुग्णालयांवर आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, गरीब रुग्ण उपचारापासून वंचित राहू नयेत तसेच त्यांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात म्हणून “धर्मादाय रुग्णालय गरीब रुग्णांच्या दारी” हा उपक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून शहरी व ग्रामीण भागातील रुग्णांना सदरील उपक्रमाचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील धर्मादाय रुग्णालयातील रिक्त खाटांची माहिती "डिजीटल डिस्प्ले" द्वारे मिळणार असल्याचे मा.सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री यांनी सन २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात जाहिर केले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, पुणे येथील धर्मादाय रुग्णालयामध्ये रुग्णांवरील उपचारासाठी राखीव असलेली संपूर्ण रक्कम संपल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गरीब रुग्णांना धर्मादाय रुग्णालयात आरोग्य सेवा पूर्ण क्षमतेने मिळावी म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. मा.उच्च न्यायालयाने निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी खाटा आरक्षित ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार राज्यातील धर्मादाय रुग्णालये सर्वसाधारणपणे सदर योजनेची अंमलबजावणी करतात असे धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे निरीक्षण आहे. तथापि, काही धर्मादाय रुग्णालये निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना आरक्षित खाटांवर उपचार देण्याबाबत टाळाटाळ करतात, अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) सद्य:स्थितीत बृहन्मुंबई क्षेत्रातील ७४ धर्मादाय रुग्णालये मा.उच्च न्यायालयीन योजनेची अंमलबजावणी करतात. सदर योजनेच्या अंमलबजावणीत कसूर केल्याचे निदर्शनास आल्यामुळे बृहन्मुंबई क्षेत्रातील दोन रुग्णालयाविरुद्ध फौजदारी प्रकरण दाखल करण्यात आले आहे. तसेच, ९ रुग्णालयांना शासकीय विभाग/प्राधिकरणांमार्फत प्रदान करण्यात आलेल्या सोयी सुविधा काढून घेण्यात आल्या असून, अन्य २ रुग्णालयांच्या सोयी सुविधा काढून घेण्याचा प्रस्ताव शासनमान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे, ६ रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असून, १२ रुग्णालयांना ताकीद देण्यात आलेली आहे.
(३) गरीब रुग्ण उपचारापासून वंचित राहू नयेत तसेच त्यांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात म्हणून धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत "धर्मादाय रुग्णालये गरीब रुग्णांच्या दारी" हा उपक्रम मुंबई व ठाणे येथे शनिवार दिनांक ०४/११/२०१७ रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी

मुंबई व ठाणे येथील धर्मादाय रुग्णालयांमार्फत एकाच दिवशी सुमारे अकरा हजार गरीब रुग्णांची तपासणी करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरीत महाराष्ट्रात शनिवार, दिनांक ०३/१२/२०१७ रोजी सुमारे ५६ हजार गरीब रुग्णांची तपासणी करण्यात आलेली आहे. तसेच काही जिल्ह्यात राबविलेल्या अतिरिक्त अभियानात, विशेष करुन आदिवासी विभागातील साधारण १५ हजार गरीब रुग्णांची तपासणी करण्यात आलेली आहे.

(४) राज्यातील धर्मादाय रुग्णालयातील रिक्त खाटांची माहिती "डिजीटल डिस्प्ले" द्वारे मिळणार असल्याचे मा.सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री यांनी सन २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात जाहीर केले असल्याबाबत कोणतेही आश्वासन अथवा अन्य कोणतीही कागदपत्रे सार्वजनिक आरोग्य विभागास संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेली नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने या विभागास कळविले आहे. तथापि, मुंबईतील धर्मादाय रुग्णालयातील निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी उपलब्ध खाटांची माहिती महानगरपालिका व शासकीय रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना उपलब्ध व्हावी यादृष्टीने पथदर्शी प्रकल्प म्हणून मुंबईतील (१) सेंट जॉर्ज रुग्णालय, (२) लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय (सायन हॉस्पिटल), (३) के.ई.एम. रुग्णालय, (४) बी वाय एल नायर हॉस्पीटल व (५) सर जे.जे. हॉस्पीटल या प्रमुख ५ महानगरपालिका व शासकीय रुग्णालयात स्मार्ट टिव्ही स्थापन करण्यात आलेले आहेत.

(५) मा.उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या योजनेतील तरतुदीनुसार, प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने सर्व रुग्णांच्या देयकांच्या दोन टक्के रक्कम (निर्धन रुग्ण व दुर्बल घटकातील रुग्ण यांची देयके वगळून) प्रत्येक महिन्याला प्रत्यक्षात निर्धन रुग्ण खात्यामध्ये जमा करावी असे बंधनकारक आहे. त्यानुसार पुणे जिल्ह्यातील सर्व धर्मादाय रुग्णालये दोन टक्के रक्कम गरीब रुग्ण निधीत जमा करुन खर्च करीत आहेत. त्यानुसार दिनांक ०१ जानेवारी, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीत पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांच्या निर्धन रुग्ण निधी खात्यात रुपये ४१,०६,०३,७०४/- (रुपये एक्केचाळीस कोटी सहा लाख तीन हजार सातशे चार) जमा झाले असून, सदर रुग्णालयांनी प्रत्यक्षात उपरोक्त कालावधीत रुपये ६०,९३,६३,२४८/- (रुपये साठ कोटी त्र्यान्नऊ लाख त्रेसष्ठ हजार दोनशे अठ्ठेचाळीस फक्त)

इतकी रक्कम खर्च केली आहे. त्यामुळे बहुतांश धर्मादाय रुग्णालयाच्या आय.पी.एफ खात्यातील रक्कम माहे डिसेंबर, २०१७ अखेर संपलेली होती. तथापि, परंतु सदरील आय.पी.एफ. खात्यामध्ये नियमानुसार पुन्हा रक्कम जमा होत असल्यामुळे गरीब रुग्णांवर योजनेतील तरतुदीनुसार मोफत व सवलतीच्या दरात उपचाराच्या योजनेत खंड पडलेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील मिहान प्रकल्पामधील जमीन पतंजली उद्योग समुहास अल्पदरात दिल्याबाबत

**(१३) * ३७७७८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ३६०४५ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहान प्रकल्पामधील रामदेव बाबा यांच्या फुड पार्कसाठी ६०० कोटी रुपयांची जमीन अल्पदरात दिली असून येथील एक एकर जमिनीचे दर १०० कोटी असताना रामदेव बाबा यांना रुपये २५ लाख प्रती एकर या दराने जमीन दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औदयोगिक प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनी वर्षानुवर्षे शहरात वापराविना पडून असल्याने अशा जमिनीचा योग्य वापर करुन घेण्यासाठी निश्चित असे धोरण ठरवून जमिनी ताब्यात घेण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त फुड पार्कसाठी अल्पदरात दिलेल्या जमिनीवर सदरील प्रकल्प अजूनही उभारण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पाद्वारे विदर्भात रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे रामदेव बाबा यांनी दिलेली जमीन शासनाच्या नवीन धोरणानुसार ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर येथील मिहान प्रकल्पामधील जमिनीचे दर प्रति एकर दर १०० कोटी रुपये असल्याची बाब खरी नाही. पतंजली उद्योग समुहास फूड पार्कसाठी निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन जमीन वितरीत करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) पतंजली उद्योग समूहामार्फत सदर जागेवर प्रकल्प उभारणीची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे, सदर जमीन परत घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याबाबत

**(१४) * ३७७७५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक ३०९८७ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यासाठी योग्य जागेची निवड करण्याकरिता राज्य शासन व भारतीय विमान प्राधिकरण यांचेमार्फत दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पुणे जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या जागांची पाहणी करण्यात आली असून त्यापैकी मुंजेवाडी-पारगाव मेमाणे (site 9A) (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील ठिकाण विमानतळासाठी योग्य असल्याचे मत नोंदविण्यात आले असून त्याबाबतचा अहवाल राज्य शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे आणि “Detailed Techno Economic Feasibility Study” बाबतच्या कार्यवाहीसाठी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक सल्लागार समिती Technical Advisory

Committee नेमण्यात आली असून या समितीत सिडको, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, मिहान इंडिया लि. व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे प्रतिनिधी सदस्य आहेत व सदर समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त समितीचा अहवाल प्राप्त होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) तांत्रिक सल्लागार समितीच्या शिफारशीनुसार Detailed Techno Economic Feasibility Study (TEFS) करण्याकरिता Dorsch Holding GmbH, Germany यांची मार्च, २०१७ मध्ये सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या सल्लागाराचे काम प्रगतीपथावर असून TEFS अहवाल जुलै, २०१८ पर्यंत मिळणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील सिटी बससेवेच्या उत्पन्नवाढीसाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१५) * ३७७०९ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात महानगरपालिकेतर्फे ३०० पेक्षा जास्त सिटी बसेस रस्त्यावर धावत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सिटी बसेसच्या उत्पन्नापेक्षा दुप्पट नुकसान महानगरपालिकेस सहन करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिटी बसेसच्या माध्यमातून होणारे नुकसान पाहता परिवहन विभागातून उत्पन्न वाढीसाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहरात ३५० डिझेल बसेस व २५ ग्रीन इथेनॉल ऑपरेटेड बसेस सुरु आहेत.
(२), (३) व (४) या उपक्रमाचे माहे डिसेंबर, २०१६ ते डिसेंबर, २०१७ अखेरचे उत्पन्न रुपये ४८.९४ कोटी इतके असून, खर्च रुपये १११.०३ कोटी लक्ष इतका आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सदरचा उपक्रम हा निव्वळ नफ्याचे उद्दिष्ट न बाळगता, व्यापक जनहित व सामाजिक दृष्टीकोनातून चालविला जात आहे.

तथापि, या उपक्रमाच्या उत्पन्नवाढीसाठी खालील उपाययोजना नागपूर महानगरपालिकेकडून करण्यात येत आहेत.:-

- बसेस वर जाहिराती लावण्याकरिता निविदा प्रक्रिया सुरु आहे.
- पार्किंग पॉलिसीद्वारे उत्पन्न प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
- ट्रांन्झीट ओरिएंटेड डेव्हलपमेंटद्वारे येणारे उत्पन्न देखील वळते करणे प्रस्तावित आहे.

-----------------

## ओम साई प्रोडक्ट सेल या कंपनीने एजंट व गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत

**(१६) * ३८६७२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.भुपेंद्र चंद्रकांत मालवणकर यांनी ओम साई प्रोडक्ट सेल या कंपनीची स्थापना करुन त्यांनी अलिबाग तालुक्यातील लोकांकडून वेगवेगळ्या वर्षासाठी रिकरींग ठेवी व फिक्स डिपॉझीटमध्ये रक्कम गुंतविल्यास मोठ्या प्रमाणात टक्केवारी देण्याची आमिष दाखवून तसेच एजंट लोकांना देखील वेगवेगळ्या

स्वरूपात कमिशन देण्यात येईल असे आमिष दाखवून ४,३४० गुंतवणूकदारांकडून रुपये ४,७०,४९,२६३/- गोळा करून या सर्व गुंतवणुकदारांची फसवणूक केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अलिबाग पोलीस स्टेशन येथे १७०/२०१७ अन्वये तक्रार नोंद केलेली असून श्री.भुपेंद्र चंद्रकांत मालवणकर यांच्या प्रॉपर्टीही जप्त करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ओम साई प्रोडक्ट सेल कंपनीमधील एजंट हे स्थानिक रहिवाशी असून त्यामध्ये बहुतांशी महिला एजंट असून सदरच्या एजंटकडून कोणत्याही रकमेची अफरातफर करण्याचा व फसविण्याचा कोणताही हेतू नव्हता तर रोजगार मिळणार आहे या उद्देशाने ते काम करीत होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर एजंटला संरक्षण व न्याय मिळवून देण्यासाठी तसेच गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) ओम साई प्रोडक्ट सेल या कंपनीचे मालक श्री.भुपेंद्र चंद्रकांत मालवणकर व अन्य एकाविरूद्ध अलिबाग पो.स्टे. कॉ.गु.रजि.नंबर १७०/२०१७, भादंवि कलम ४२०, ४०६, ४०९, ३४ व महा. ठेवीदारांचे हितसंरक्षण अधिनिमय, १९९९ चे कलम २(ड) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, रायगड-अलिबाग हे करीत आहेत. आरोपींनी दुसऱ्या कंपनीत गुंतविलेल्या रुपये ९,१३,०४०/- रकमेचा डी.डी. मा.अलिबाग न्यायालयात जमा करण्यात आला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) आरोपीची संपत्ती जप्त करण्याबाबत महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरोरा (जि.चंद्रपूर) येथील जी.एम.आर. पॉवर प्लँट मधील कामगारांना कामगार कायद्यानुसार सुविधा देण्याबाबत

**(१७) * ३९११० श्री.परिणय फुके :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथील जी.एम.आर. पॉवर प्लँटमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना कोणताही अतिकालिक (ओव्हर टाईम) न देता ८ तासाऐवजी १२ तास काम करुन घेण्यात येत असल्याचे तसेच कंपनी व्यवस्थापनाकडून कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करण्याबाबत धमकी देण्यात येत असल्याचे निवेदन कामगार संघटनेच्या प्रतिनिधींनी मा.कामगार मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांना घरभाडे देणे लागू असताना सुध्दा कर्मचाऱ्यांना घरभाड्याची रक्कम कंपनीमार्फत दिल्या जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात केली जाते परंतु ती रक्कम भविष्य निर्वाह निधी कार्यालयात भरणा केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कामगार कायद्यानुसार ज्या सुविधा कामगारांना द्यावयास पाहिजे त्या त्यांना पुरविण्यात येत नसल्याने उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) कामगार संघटनेचे माहे ऑक्टोबर, २०१७ मधील निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, जी.एम.आर.पॉवर संघटना, वरोरा यांचे दिनांक २७/११/२०१७ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) या प्रकरणी प्राप्त तक्रारीनुसार दिनांक २१/१२/२०१७ रोजी अपर कामगार आयुक्त, नागपूर यांच्या अधिपत्याखालील ४ सरकारी कामगार अधिकारी व ६ दुकाने निरीक्षक यांच्या संयुक्त पथकामार्फत सदर आस्थापनेचे किमान वेतन अधिनियम, १९४८, बोनस प्रदान अधिनियम, १९६५, कंत्राटी कामगार अधिनियम, १९७०, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व

महाराष्ट्र किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ अंतर्गत निरीक्षणे करण्यात आली. त्यामध्ये सकृतदर्शनी निदर्शनास आलेल्या बाबी व त्यानुसार करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे:-

१) कंत्राटी कामगारांना किमान वेतन दराप्रमाणे वेतन देण्यात येते. कंत्राटी कामगारांचे वेतन दर महिन्याला ७ तारखेनंतर होते. कामगारांना वेतन स्लिप देण्यात येत असून कामगारांचे वेतन बॅकेमार्फत करण्यात येते.

२) कामगारांना पीएफ व इएसआयसीची सुविधा कायद्यानुसार देत असल्याचे व्यवस्थापनाने सादर केलेल्या अभिलेखावरुन दिसून आले. तथापि, भविष्य निर्वाह निधीची रकमेचा भरणा भविष्य निर्वाह निधी कार्यालयात करण्यात येते किंवा कसे याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

३) कामगार नियमितपणे ८ तास डयूटी करीत असल्याचे दिसून आले. कामगारांनी ओव्हर टाईम केल्यास त्यांना अतिकालिक वेतनानूसार दुप्पट दराने वेतन अदा करण्यात येते.

४) कामगारांना कायदयानूसार पगारी अर्जित रजा देण्यात येतात.

५) १२ कामगारांना कायदयानूसार ५ टक्के घरभाडे भत्ता न दिल्याचे आढळून आले. सदर कामगारांना घरभाडे भत्ता देण्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे निदेश व्यवस्थापनास देण्यात आले होते. तसेच दिनांक १७/०२/२०१८ रोजी व्यवस्थापनास महाराष्ट्र किमान घरभाडे अधिनियम, १९८३ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानुसार जानेवारी, २०१८ पासून सर्व कामगारांना घरभाडे अदा करण्यात येत आहे.

६) कामगारांना कॅंटीन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

७) कामगारांना बोनस अदा केले जाते.

किमान वेतन दर महिन्याला ७ तारखेपूर्वी अदा न करणे, काही कामगारांना घरभाडे भत्ता अदा न करणे याबाबत व्यवस्थापनास लवकरात लवकर कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व महाराष्ट्र किमान घरभाडे अधिनियम, १९८३ नुसार दिनांक १७/०२/२०१८ रोजी

कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार जानेवारी, २०१८ पासून कामगारांना दर महिन्याला ७ तारखेपूर्वी वेतन व घरभाडे अदा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ज्येष्ठ अभिनेत्री सायरा बानो यांना बांधकाम व्यावसायिक धमकावित असल्याबाबत

**(१८) * ३७६८७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे, पाली हिल परिसरातील बंगला बळकावण्यासाठी बांधकाम व्यावसायिक समीर भोजवानी दबाव आणत आहेत तसेच धमकावित असून ते पैसा व ओळखीचा वापर करुन खोट्या तक्रारी करतील आणि आम्हाला गुंतवतील अशी तक्रार ज्येष्ठ अभिनेत्री सायरा बानो यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आर्थिक गुन्हे शाखेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी बांधकाम व्यावसायिकाविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.

फिर्यादी श्रीमती सायरा बानो खान यांनी त्यांच्या तक्रार अर्जात गैरअर्जदार समीर भोजवानी याने बनावट कागदपत्र बनवुन मा.श्री.युसूफ खान *ऊर्फ* दिलीप कुमार यांचे रजिस्टरनुसार त्यांच्या नावावर असणारे त्यांचे राहते घर आणि जागा हडप करण्याचा प्रयत्न केला अशी तक्रार केली आहे. त्यास अनुसरून सदर प्रकरणात चौकशीत आरोपी समीर नारायण भोजवानी यांने लबाडीने व इतर साक्षीदारांच्या संगनमताने फिर्यादी श्रीमती सायरा बानो व दिलीपकुमार यांनी प्लॉट नं. १६ मधील CTS no. C-१३९५-१३९६-१३९७

पाली हिल, बांद्रा, मुंबई ही जागा लिजवर घेतलेली असून त्यांचे राहते घर व जागा स्वत:च्या नावावर करण्यासाठी संबंधित कागदपत्र बनावट केली आणि ती खरी म्हणून उपनिबंधक अंधेरी कार्यालयात सादर करुन नोंदी करुन घेतल्या असल्याचे निष्पन्न झाल्याने गैरअर्जदार समीर भोजवानी व साथीदारांच्या विरोधात खार पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ०५/१८, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ.नरेंद्र दाभोळकर, कॉम्रेड गोविंद पानसरे व प्रा.कलबुर्गी यांच्या हत्येच्या तपासाबाबत

**(१९) * ३७६५९ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती विद्‌या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९८१ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.नरेंद्र दाभोळकर, कॉम्रेड गोविंद पानसरे व प्रा.कलबुर्गी यांच्या हत्येप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने निवृत्त न्यायमुर्तींच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे आदेश राज्य शासनाला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने याप्रकरणी सी.बी.आय तसेच राज्य शासनाकडून करण्यात येणाऱ्या तपासाच्या प्रगतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उक्त प्रकरणांच्या तपासाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्‌य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येच्या अनुषंगाने डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १५४/२०१३ भादंवि कलम ३०२, ३४ शस्त्र अधिनियम ३(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ७/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ९/५/२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर गुन्ह्याचा तपास दिनांक ३/६/२०१४ रोजी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सी.बी.आय.कडून सुरू आहे.

कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या संदर्भात कोल्हापूर जिल्ह्यातील राजारामपुरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३९/२०१५ भादंवि कलम ३०२, ३०७, १२०(ब), ३४ सह आर्म अॅक्ट ३(१)/२५ (१ब)(अ), ५(२७) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक करून त्यांच्याविरूद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रीट पिटीशन क्र.१५६५/२०१५ अन्वये व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे दिनांक २०/०४/२०१५ अन्वये अप्पर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिपत्याखाली नियुक्त केलेल्या विशेष तपास पथक (S.I.T.) करवी गुन्ह्याचा पुढील तपास सी.आर.पी.सी. १७३(८) प्रमाणे चालू आहे तसेच उर्वरित दोन आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

प्रा.कलबुर्गी यांच्या हत्येचा गुन्हा कर्नाटकात घडलेला असल्याने त्याचा तपास कर्नाटक सी.आय.डी. कडे सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील देवनार येथील स्मशानभूमीच्या दूरवस्थेबाबत

**(२०) * ३८०८५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, अॅड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील देवनार येथील स्मशानभूमीच्या दूरवस्थेबाबत स्मशानभूमीतील कर्मचारी व स्थानिक नागरिकांनी महानगरपालिकेकडे अनेकवेळा तक्रार करुनही महानगरपालिका प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर स्मशानभूमीची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) देवनार येथील स्मशानभूमी/दफनभूमीचे सौंदर्यीकरण व सर्वंकष दुरुस्ती करण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था व कर्मचारी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केली होती ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) देवनार संयुक्त स्मशानभूमीची दुरुस्ती करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

सदर स्मशानभूमीच्या दुरुस्ती व सौंदर्यीकरणाचा अंतर्भाव असलेला सर्वंकष नकाशा तयार करण्यात आला आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु असून, अंदाजपत्रक मंजुरीनंतर निविदा प्रक्रियेअंती दुरुस्ती व सौंदर्यीकरणाचे काम सुरु करण्यात येणार आहे.

मुंबईच्या स्मशानभूमींच्या दुरुस्ती व विकास कामांकरिता करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीमधून सदर कामाचा खर्च भागविण्यात येणार आहे.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने अपना घर सहकारी गृहनिर्माण संस्थेला परिशिष्ट-२ तयार न करता आशयपत्र दिल्याबाबत

**(२१) * ३८८९५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने अपना घर सहकारी गृहनिर्माण संस्था, महमद जान मुनिर चाळ नं. २/११ तेली गल्ली, अंधेरी (पूर्व) मुंबई ६९ यांनी झोपडीधारकांची माहिती विहित नमुन्यात सादर केली नसल्यामुळे परिशिष्ट-२ तयार न करता पुनर्विकास प्रकल्पासाठी आशयपत्र LOI दिल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२२) * ३७९१० श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी-सुविधांच्या विकास कामांकरिता विशेष अनुदान या योजनेमधून दिनांक २७ ऑगस्ट, २०१३ च्या शासन निर्णयामध्ये मंजूर व अर्धवट असलेल्या कामांचा २० टक्के निधी मिळण्याकरिता सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रान्वये नगरविकास विभागाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील प्रलंबित निधी वितरीत करूनही प्रलंबित विकासकामे पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून या संदर्भात अहवाल मागविण्यात आला आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयासाठी वैद्यकीय उपकरणाच्या खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * ३८३७५ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयासाठी वैद्यकीय उपकरणाच्या खरेदीच्या निविदेतील अटीशर्ती मध्ये नियमबाहय बदल करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिका रुग्णालयासाठी उपकरणे खरेदीसाठी मे.पिनॅकल बायोमेड या कंपनी कंत्राटदाराकडूनच निविदा मागवून त्याला पात्र करुन कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या रूग्णालयासाठी उपकरणे खरेदीकरीता मार्च-२०१५ मध्ये मागविलेल्या निविदांच्या आर्थिक उलाढाल व अनुभवाच्या अटींमध्ये बदल करून जुलै, २०१७ मध्ये नव्याने निविदा मागविण्यात आल्या. तथापि, सदर बदल नियमबाहय आहेत अशी वस्तुस्थिती नाही.

(२) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या चार रूग्णालयांकरीता आवश्यक उपकरणे खरेदी करणेकरीता ग्रुप-१ मध्ये ८० उपकरणे व ग्रुप-२ मध्ये ४९ उपकरणे अशा एकूण १२९ उपकरणांकरीता दोन स्वतंत्र निविदा माहे जुलै, २०१७ मध्ये ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात आल्या.

त्यानुषंगाने ग्रुप-१ करीता ८ निविदा प्राप्त झाल्या. सदर ८ निविदांपैकी निविदेच्या अटी व शर्तीनुसार मे.ड्रॅगर इंडिया प्रा.लि. व मे.पिनॅकल बायोमेड हे दोन निविदाकार पात्र ठरले. यापैकी बाब निहाय न्युनतम असलेल्या मे.ड्रॅगर इंडिया प्रा.लि. यांना २ उपकरणे तर मे.पिनॅकल बायोमेड यांना १८ उपकरणे अशी एकूण २० उपकरणे खरेदीसाठी कार्यादेश देण्यात आले.

ग्रुप २ करीता ५ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी अटी व शर्तीनुसार ३ निविदाकार पात्र ठरले. त्यातील न्यूनतम निविदाधारक मे. पिनॅकल बायोमेड कंपनीस ८ उपकरणे खरेदीसाठी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

उर्वरित उपकरणांच्या खरेदीसाठी फेरनिविदा प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

निविदेतील अटी व शर्तीबाबत मे.महाराष्ट्र सर्जिकल व इतर एजन्सींनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ७१२/२०१८ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील महामेट्रो प्रकल्पाच्या जागा हस्तांतरणाबाबत

**(२४) * ३८७८० श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये सुरु असलेल्या महामेट्रो प्रकल्पाच्या कामासाठी शहरातील १७ जागांची मागणी महामेट्रो प्रकल्पाने केली असून महापालिकेने आतापर्यंत फक्त ३ जागांचे हस्तांतर केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामेट्रो प्रकल्पाकरिता शहरातील कोणकोणत्या ठिकाणच्या जागांची मागणी करण्यात आली आहे,
(३) असल्यास, महामेट्रोचा प्रकल्प विनाविलंब पूर्ण होण्याचेदृष्टीने महामेट्रोने मागणी केलेल्या १७ ठिकाणच्या जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) पुणे मेट्रो रेल प्रकल्पाकरिता (१) कचरा डेपो कोथरुड, (२) स्वारगेट वॉटर बॉडिज लॅन्ड वॉटर ट्रिटमेन्टसाठी आरक्षित, (३) पेशवेपार्क येथील वाहनतळाची जागा, (४) जुना बोपोडी नाका पीएमसी, (५) आयडियल कॉलनी, पीएमसी आरक्षण कोथरुड, (६) बालगंधर्व रंगमंदिर पार्किंग, (७) पीएमपीएमएल बस स्टॅन्ड, पीएमसी बिल्डींगशेजारी, (८) बंडगार्डन स्टेशनजवळ, (९) रमाबाई आंबेडकर उद्यान, (१०) नाना नानी उद्यान, शनिवार पेठ, (११) धोबी घाट, शनिवार पेठ, (१२) सार्वजनिक शौचालयासमोरील नारायणपेठ, (१३) कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयातील कंपाऊंडचे आतील जागा, (१४) सणस ग्राऊंडमधील पीएमपीएमएल पार्किंगची जागा, (१५) आयडियल कॉलनीजवळ व (१६) स्टेशन एनट्री/एक्झीटसाठी मंडईजवळील जागा मिळणेसाठी पुणे महानगरपालिकेकडे महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. पुणे यांनी जागांची मागणी केली आहे.

यापैकी पेशवेपार्क येथील वाहनतळाची जागा, कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयातील कंपाऊंडचे आतील जागा व आयडियल कॉलनीजवळील जागा पुणे महानगरपालिकेमार्फत महामेट्रोस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
(३) व (४) पुणे महानगरपालिकेकडे मागणी केलेल्या जागा हस्तांतरीत होणेसाठी पुणे महानगरपालिकेकडे पाठपुरावा करणेत येत असून त्यानुषंगाने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

## औरंगाबाद शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पर्यायी जागा निवडण्याबाबत

**(२५) * ३९१२० श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबादमधील मांडकी येथील ग्रामस्थांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आंदोलन मागे घेऊन नारेगावच्या डेपोत कचरा टाकण्यासाठी महानगरपालिकेस ३ महिन्याची मुदत दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणास दीड महिन्याचा कालावधी होऊनही कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकेने कोणत्याच प्रकल्पाचे काम सुरु केले नसल्याने नविन प्रकल्प स्थापन करण्यासाठी किमान ६ महिन्यांचा कालावधी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औरंगाबाद शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पर्यायी जागा निवडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नारेगांव-मांडकी कृती समितीने दिनांक १६/१०/२०१७ रोजी नारेगांव कचरा डेपोत कचरा टाकण्यास औरंगाबाद महानगरपालिकेस ४ महिन्यांचा कालावधी दिला होता, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) औरंगाबाद महानगरपालिकेने कचऱ्यासाठी नारेगांव-मांडकी व्यतिरिक्त इतरत्र ठिकाणी जागा शोधण्याचा प्रयत्न केला असता तेथील ग्रामस्थांनी त्यास विरोध केलेला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या, औरंगाबाद खंडपीठात या प्रकरणी जनहित याचिका दाखल झाली असून, औरंगाबाद कचरा प्रश्नाप्रकरणी शासनाने हस्तक्षेप करावा असे निदेश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत.

या प्रकरणी मार्ग काढण्याच्यादृष्टीने मा.मुख्यमंत्री यांच्यास्तरावर विशेष बैठक घेण्यात आली.

औरंगाबाद महानगरपालिकेने शहरातील घनकचरा व्यवस्थापन करण्याच्यादृष्टीने पुढीलप्रमाणे अल्पकालीन व दिर्घकालीन उपाययोजना करण्यासंदर्भात निर्देश देण्यात आलेले आहेत.

अ) औरंगाबाद महानगरपालिकेने व्यापक मोहिम (मीशन मोडवर) राबवून शहरात निर्माण होणाऱ्या १००% कचऱ्याचे निर्मितीच्या जागीच ओला व सुका कचरा असे विलगीकरण करावे.

आ) ओल्या कचऱ्यावर शहरातच विकेंद्रीत पध्दतीने प्रक्रिया करावी.

इ) सुक्या कचऱ्याचे पदार्थ पुनर्प्राप्ती सुविधेच्या ठिकाणी दुय्यम विलगीकरण करुन त्या सुक्या कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करावी.

ई) नारेगांव-मांडकी येथील सद्य:स्थितीत साठवलेल्या कचऱ्यावर पुढील १२ महिन्यात शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करावी.

उ) औरंगाबाद महानगरपालिकेने वरीलप्रमाणे कार्यवाही तात्काळ सुरु केल्यास शहरातील कचऱ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबिवली व अटळी (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील अनधिकृत बांधकामाबाबत

**(२६) * ३९०३६ श्री.रविंद्र फाटक** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबिवली व अटळी (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील सार्वजनिक हिताकरिता आरक्षित असलेल्या भूखंडावर चाळ माफियांनी अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत उभारण्यात आलेली घरे सामान्य नागरिकांना विकून त्यांची फसवणूक केली जात असल्याने अनधिकृत बांधकामे पाडण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यास टाळाटाळ करणाऱ्या तत्कालीन प्रभागक्षेत्र अधिकाऱ्यास दिनांक २/०२/२०१८ रोजी निलंबित केलेले आहे.

विद्यमान प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी यांनी दिनांक ०२/०२/२०१८ व दिनांक ०३/०२/२०१८ रोजी विशेष मोहिम राबवून तक्रारीच्या अनुषंगाने आरक्षित भूखंडावरील ६१ अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत.

उर्वरित सुमारे ३०० अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू करण्यात आली असून, पुढील ६ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई व राज्यातील अन्य शहरात अनधिकृत फलक लावण्यात येत असल्याबाबत

**(२७) * ३९०११ श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व राज्यातील अन्य शहरात अनधिकृत फलक उभारण्यात येत असल्याने मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनावर ताशेरे ओढले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतानाही मुंबईत अनधिकृत फलक लावण्यात येत असून याकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) राज्यातील अनधिकृत जाहिरात फलक, होर्डिंग, बॅनर, इत्यादी संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत दिनांक १२/१/२०१८ रोजी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१५५/२०११ याप्रकरणी सुनावणी झालेली असून मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास अनुसरून पुढील आवश्यक कार्यवाही सुरू आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने अनधिकृत होर्डिंग/फलकाबाबत तक्रारी करण्यासाठी जनतेस टोल फ्री नंबर उपलब्ध करून दिलेला आहे. अनधिकृत फलक लावल्याचे आढळल्यास अथवा अशी तक्रार प्राप्त झाल्यास त्यावर विभाग पातळीवर दैनंदिन निष्कासनाची कारवाई तातडीने करण्यात येते. तसेच विहित पध्दतीप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात येतात असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने जानेवारी, २०१७ ते डिसेंबर, २०१७ पर्यंत ९२८४ बॅनर्स व पोस्टर्स निष्कासित केलेली आहेत. तसेच व्यावसायिक बॅनर्सवर ८९२ खटले दाखल करण्यात आले आहेत.

अनधिकृत उभारण्यात येणाऱ्या बॅनर्स विरूध्द महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंधक कायदा १९९५ अन्वये तक्रार दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनला १८६५ पत्रे पाठविली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मल्टीफ्लेक्स चित्रपटगृहातील दर्शनी भागात नियमावली लावण्याबाबत

**(२८) * ३८०५८ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.प्रविण दरेकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबईसह अन्य शहरांतील मल्टीप्लेक्स चित्रपटगृहात प्रेक्षकांना बाहेरचे किंवा स्वतःचे खाद्यपदार्थ नेण्यास मनाई करण्याबाबतचा निर्णय चित्रपटगृहांच्या मालकांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच वाहनतळ व दुरुस्ती शुल्क आकारणे बेकायदा असणे असे महाराष्ट्र राज्य ग्राहक कल्याण समितीने जाहिर केले असून याबाबतची नियमावली मल्टीप्लेक्स चित्रपट चालकांनी चित्रपटगृहाच्या दर्शनी भागात लावावी असे आदेशही दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, खाद्यपदार्थ चित्रपटागृहात नेण्यास कोणतीही कायदेशीर तरतुद नसतांनाही चित्रपटगृहांच्या मालकांकडून अशी बंधने घालून घटनेतील अनुच्छेद २१ अन्वये असलेल्या जगण्याच्या हक्काचे उल्लंघन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समितीच्या आदेशाची अंमलबजावणी मल्टीप्लेक्स चित्रपटगृहांनी करावी, यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) प्रेक्षकांना बाहेरचे किंवा स्वत:चे खाद्यपदार्थ नेण्यास मनाई करण्याबाबतचा निर्णय चित्रपटगृहाच्या मालकांनी नुकताच घेतल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) अशा प्रकारचे कोणतेही आदेश शासनास प्राप्त झालेले नाहीत.
(३) व (४) या संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे एक जनहित याचिका दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे काळाधोंडा (ता.उरण, जि.रायगड) येथील अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२९) * ३८९७६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काळाधोंडा तेलीपाडा (ता.उरण, जि.रायगड) येथे मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकाम करणाऱ्या आरोपीविरुध्द सिडकोकडे दप्तरी पुरावे असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील आरोपी निर्दोष सुटल्यानंतर अपील प्रपोजल पाठविण्यास प्रशासनाने ५९४ दिवस विलंब लावला, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यासदंर्भात ॲड.शशिकांत पाटील यांनी संबंधित विभागाचे व्यवस्थापकीय संचालक यांना वारंवार अर्ज देऊनही त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर ठिकाणी अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांवर व या बाधकांमाना अभय देणाऱ्या सिडको प्रशासनातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मौजे काळाधोंडा (तेलीपाडा), ता.उरण, जि.रागयड येथील श्री.किशोर हरी पाटील यांनी सर्व्हे क्र. २४/१ मध्ये जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने सिडकोने दिनांक २०/३/२००२ रोजी नोटीस देऊन श्री.किशोर हरी पाटील यांच्याविरुध्द उरण पोलीस ठाण्यामध्ये एफआयआर दाखल केला होता. तथापि, या प्रकरणी श्री.पाटील यांना मा.न्यायालयाने दिनांक १४/०२/२००८ रोजी निर्दोष मुक्त केले. सदर निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले फौजदारी अपिल क्र. ४५२/२०१० विलंबाच्या कारणास्तव फेटाळले आहे. सदर अनधिकृत बांधकाम गरजेपोटी केल्याचे नमूद करुन ते नियमित करण्यासाठी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने सिडकोस अर्ज केलेला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

तसेच सर्व्हे नं.४४/५ मधील अनधिकृत बांधकामाबाबत श्रीमती मंदा हरी पाटील यांना महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ अंतर्गत दिनांक २१/७/२०१७ रोजी नोटीस देण्यात आली आहे. त्यावर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने १२.५% योजनेंतर्गत या भूखंडावर शिल्लक पात्रता मिळण्याबाबत अर्ज केला असून त्यावर प्रचलित शासन धोरणानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांची गुप्तचर विभागामार्फत चौकशी करण्याबाबत

**(३०) * ३८७२३ श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेतील अधिकाऱ्यांशी संगनमत करून अनधिकृत बांधकामे करणारा आणि इतरांच्या अनधिकृत बांधकामांना अभय मिळवून देणाऱ्या सखाराम शंकर खोपडे उर्फ बाळाशेठ व त्यांस अभय देणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांची गुप्तचर विभागामार्फत चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी लोअर परळ रहिवाशी मंडळाने एका लेखी निवेदनाद्‌वारे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, नगरविकास तसेच आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) लोअर परेल, मुंबई येथील उर्मी इस्टेटमध्ये श्री.सखाराम शंकर खोपडे (बाळा शेठ) यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामामुळे होणाऱ्या नाहक त्रासाबाबत या विषयाबाबत लोअर परेल रहिवाशी मंडळ यांनी दिनांक ०१/०१/२०१८ रोजी केलेल्या तक्रारी नगरविकास विभागास प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर तक्रारी पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठविण्यात आल्या आहेत.

तसेच, सदर तक्रारींमध्ये नमूद विषयाच्या अनुषंगाने तात्काळ चौकशी करुन चौकशीचा अहवाल शासनास उलट टपाली पाठविण्याच्या सूचना दिनांक २८/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

-----------------

## अकोला महानगरपालिकेतील मंजूर कामाबाबत

**(३१) * ३८१९० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका हद्दीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मंजूर करुन दिलेल्या तांत्रिक मान्यतेला अनुसरुन जलवाहिनीचे काम सुरु असून सदर काम कोणत्या कंत्राटदारामार्फत करण्यात येत आहे व संबंधित कंत्राटदाराने सदरहू कामे ही अकोला महानगरपालिकेच्या परवानगीने सादर केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत मौजे बार्शीटाकळी (ता.जि.अकोला) येथून अकोल्याकडे येणाऱ्या मुख्य जलवाहिनीचे काम हे संबंधित कंत्राटदाराने राष्ट्रीय महामार्ग क्र १६१-ए विभाग अकोला यांची परवानगी न घेता सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत जलवाहिनीचे खोदकाम करुन त्यावरुन नळ कनेक्शन देणे, मिटर लावणे व केलेले खोदकाम बुजविणे हे सर्व कामाच्या एकत्र प्रकियेचा भाग नसल्याने सदर कामाची तांत्रिक विभागणी करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अकोला महानगरपालिकेचा पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर आहे.

सदर प्रकल्पाच्या सविस्तर आराखडयास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता दिली आहे.

अमृत अभियानांतर्गत गठित राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने सदर प्रकल्पास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

प्रस्तुत प्रकल्पाचे कार्यादेश ए.पी. आणि जे.पी. असोसीएट्स यांना अकोला महानगरपालिकेमार्फत माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये देण्यात आले आहेत, हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पातील जलवाहिनी, राज्य मार्ग क्र.२७३ च्या बाजूने टाकण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये परवानगी दिली आहे.

सदर प्रकल्पाचे काम अकोला महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आले आहे.

सध्या राज्य मार्ग क्र.२७३ हा राष्ट्रीय मार्ग क्र. १६१-ए मध्ये परिवर्तीत झाला असल्याचा अहवाल अकोला महानगरपालिकेने सादर केला आहे.

(३) व (४) बार्शिटाकळी शहराबाहेरुन जाणारी प्रस्तावित गुरुत्ववाहिनी ही अकोला शहरातील पाण्याच्या उंच टाक्या भरण्याकरीता असल्याने त्या जलवाहिनीवरुन नळ कनेक्शन देणे व मीटर लावणे अंतर्भूत नाही.

अकोला शहरामध्ये वितरण व्यवस्थेच्या कामांतर्गत जलवाहिनीचे खोदकाम करणे, त्यावरुन नळ कनेक्शन देणे व केलेले खोदकाम बुजविणे या बाबींचा समावेश असून मीटर लावणे अंतर्भूत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी समाजाच्या मागण्याबाबत

**(३२) * ३९२५८ श्री.हरिसिंग राठोड** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी समाज्याच्या मागण्यांसंदर्भात नागपूर अधिवेशनादरम्यान मोर्चा काढण्यात येवून दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीच्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी त्वरित करण्याबाबतचे निवेदन माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्तनाते संबंधातील जात वैधता प्रमाणपत्राच्या संबंधाने गठीत केलेल्या मंत्रीगट उपसमिती रद्द करण्याची मागणी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासीच्या जमीन हस्तांतरण व पेसा कायद्यांतर्गत ग्रामसभेच्या मान्यतेची अट कायम ठेवावी याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय,

(३) मा.राज्यपाल महोदयांनी भारतीय राज्यघटनेच्या ५ व्या अनुसूचितील परिच्छेद क्र. ५ (१) मधील प्राप्त अधिकारानुसार, दिनांक १४/०६/२०१६ रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ (अ) मधील पोटकलम (१) मध्ये समाविष्ट केलेल्या नवीन परंतुकानुसार राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील गावांमध्ये ग्रामसभेची मंजूरी मिळाल्याशिवाय आदिवासी व्यक्तींचा भोगवटा बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरीत करण्यास मंजूरी देता येत नाही.

तसेच शासनाने केलेल्या विनंतीनुसार राज्यपाल महोदयांनी दिनांक १४/११/२०१७ रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार, राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील गावांमध्ये महाराष्ट्र जमीन महसूलसंहिता, १९६६ च्या कलम ३६ (अ) मधील पोटकलम (१) मध्ये नव्याने समाविष्ट परंतुकानुसार, केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या निकडीच्या सार्वजनिक प्रकल्पांना, प्रकल्पांचे काम खोळंबुन राहू नये व त्यांची कार्यपुर्ती विहित कालमर्यादेत व्हावी यादृष्टीने ग्रामसभेच्या पुर्व मंजूरीच्या अटीतून सुट देण्यात आलेली आहे.

मुद्दा क्र.(१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ६ जुलै, २०१७ च्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

मुद्दा क्र.(२) संदर्भात रक्तनाते संबंधातील जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे कुटुंबातील इतर व्यक्तींना जात प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याबाबतचे नियम २००३ मध्ये

सुधारणा करण्याबाबत आदिवासी विकास विभागाच्या दिनांक १५/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.

-----------------

## नाशिक शहरात सुधारित सर्वंकष वाहतुक आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३३) * ३९४१८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१७९१ ला दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील वाहनांची वाढती संख्या व सततची वाहतुक कोंडी यामुळे नागरिकांची गैरसोय होत असून वेळ व इंधनाचा होणारा अपव्यय इत्यादी बाबी विचारात घेता नाशिक महानगरपालिकेने शहराचा सुधारित सर्वंकष वाहतुक आराखडा तयार करण्याचे काम मेसर्स अर्बन मास्क ट्रान्सीट कंपनी लि., (UMTC) नवी दिल्ली या तज्ञ सल्लागार संस्थेस देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सल्लागार संस्थेने शहराचा सुधारित सर्वंकष वाहतुक आराखड्याचा प्रारुप अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुधारित सर्वंकष वाहतुक आराखड्याच्या प्रारुप अहवालातील शिफारशींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरील सल्लागार संस्थेकडून माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर प्राप्त होणे अपेक्षित असलेला अंतिम अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, सर्वंकष वाहतुक आराखड्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) मेसर्स अर्बन मास्क ट्रान्सीट कंपनी लि., नवी दिल्ली या सल्लागारामार्फत अंतिम सुधारित सर्वकष वाहतुक आराखडा नाशिक महानगरपालिकेस सादर करण्यात आला आहे. सदर आराखड्यात अल्प, मध्यम व दिर्घ मुदतीत करावयाच्या सुधारणांचा समावेश आहे.

सुधारित सर्वकष वाहतुक आराखड्याच्या अहवालातील शिफारशीमध्ये नजिकच्या भविष्यात घ्यावयाच्या सुधारणा सूचनांमध्ये चौक सुधारणा, फुटपाथ बांधणे, पादचारी पुल, पादचारी भुयारी मार्ग, सायकल ट्रॅक निर्मिती, सार्वजनिक वाहने डिझेल, सीएनजीमध्ये रुपांतरीत करणे, इलेक्ट्रीक बसेस वापरात आणणे आदी उपायांचा समावेश आहे.

मध्यम कालावधीत करावयाच्या सुधारणा उपायांमध्ये ट्रॅक टर्मिनसची सुधारणा करणे, चौकांमध्ये ट्रॅफीक सिग्नल, क्षेत्रिय वाहतुक नियंत्रण यंत्रणा, आयटीएस कन्ट्रोल सेन्टर, रस्त्याच्या कडेला व मोकळ्या भुखंडावर वाहनतळ व्यवस्था आदी उपायांचा समावेश आहे. तसेच दिर्घ मुदतीच्या उपाययोजनांमध्ये अस्तित्वातील रस्त्यांचे सुधारणा करणे, बाह्यरिंग रस्त्याची निर्मिती, उड्डाणपुल रेल्वेचे पुल-नविन बस टर्मिनल यांची उभारणी, उच्च क्षमता सार्वजनिक बस वाहतुकीस स्वतंत्र वाहतुक मार्गिका, रेल्वेवर आधारीत वाहतुक व्यवस्था, नविन ट्रक टर्मिनसची निर्मिती या सूचनांचा समावेश आहे.

(४) होय.

(५) व (६) नाशिक महानगरपालिकेमार्फत आवश्यक कार्यवाही करण्याबाबतचे नियोजन करण्यात येत आहे.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील गोदामांना आग लागल्याच्या घटनेबाबत

**(३४) * ३९५४४ श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील रासायनिक पट्टयातील ओवळीच्या हद्दीत असलेल्या सागर कॉम्प्लेक्समधील चेक पॉईंट या कंपनीतील १६ गोदामांना आग लागून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ-२ भिवंडी येथे दिनांक ०६/१२/२०१७ रोजी सकाळी ९.३० चे सुमारास सागर कॉम्प्लेक्समधील बिल्डिंग बी येथील गाळा क्रमांक १ ते १६ या गोदामांना आग लागल्याची घटना घडली आहे.
(२) मे.चेकपॉईंट सिस्टीम इंडिया प्रा.लि. या कंपनीने सागर कॉप्लेक्स येथील गोदाम गाळा क्रमांक १ ते ५ हे भाडयाने घेतलेले होते. या ठिकाणी कंपनीकडून कोणतीही आग प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आलेली नव्हती. यातील गाळा क्र. ५ मध्ये इलेक्ट्रिक शॉर्टसर्किट होऊन तेथील ज्वलनशील पदार्थाने पेट घेतल्याने आग लागून सदर आग गाळा क्रमांक १ ते ५ व बाजूच्या गाळा क्रमांक ६ ते १६ पर्यंत पसरली.

या आगीमध्ये १) मे.चेकपॉईंट सिस्टीम इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या मालकीचा रुपये ५ कोटी इतक्या किंमतीचा सिक्युरिटी सिस्टिम इक्विपमेंट व डिस्प्ले प्रॉडक्टसचा माल, २) मे.अजीत इंडस्ट्रिज प्रा.लि. या कंपनीच्या मालकीचा रुपये १७ कोटी किंमतीचा पेपर टेप, टिश्यू टेप व पी.व्ही.सी.टेपचा माल व ३) मे.आर.आर. लॉजिस्टिक्स कंपनीच्या मालकीचा रुपये ७ कोटी किंमतीचा प्राण्यांची औषधे व खाद्य, पोल्ट्री व्हॅक्सीन अशा एकूण रुपये २९ कोटी किंमतीच्या मालाचे जळून नुकसान झाले आहे.

याप्रकरणी मे.चेकपॉईंट सिस्टीम इंडिया प्रा.लि. कंपनीचे जनरल मॅनेजर यांचेविरुध्द नारपोली पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ७/२०१८, भा.दं.वि. २८५, ३३६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंडणगड (जि.रत्नागिरी) नगरपंचायतीतील विकासकामे अपुर्ण असल्याबाबत

**(३५) * ४०३३० श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड (जि.रत्नागिरी) नगरपंचायती अंतर्गत नगरोत्थान योजनेतील रुपये १ कोटी ४० लाख रुपयांची कामे निविदा प्रक्रियेच्या निर्णयाअभावी अपूर्ण असून सदर निधी माहे मार्च, २०१८ पर्यंत खर्च न केल्यास परत जाणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली दोन वर्ष उक्त नगरपंचायतीच्या हद्दीतील विकासकामे ठप्प असून स्थानिक नगरसेवकांना विकासकामे न करता आल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नगरपंचायतीकरिता कायमस्वरूपी मुख्याधिकारी व अभियंता यांची नियुक्ती करण्यास शासनाकडून विलंब होत असल्याने तसेच प्रभारी मुख्याधिकारी, मंडणगड नगरपंचायत यांच्याकडून कामात निष्काळजीपणा होत असल्याने विकासकामे ठप्प आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रभारी मुख्याधिकारी, मंडणगड नगरपंचायत यांनी प्रस्तावित कामे व विविध विषयावर निर्णय घेण्यासाठी बोलावलेल्या विशेष सभेला कोणतीही पूर्वसूचना न देता ते अनुपस्थित राहिल्यामुळे संतप्त नगराध्यक्ष आणि नगरसेवकांनी त्यांच्या कार्यालयाला टाळे ठोकले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार प्रभारी मुख्याधिकारी, मंडणगड नगरपंचायत यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत व उक्त ठिकाणी कायमस्वरूपी मुख्याधिकारी व अभियंता यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेंतर्गत मंडणगड नगरपंचायतीला सन २०१५-१६ करीता रुपये १.०२ कोटी निधी मंजूर होता. सदर मंजूर निधी पूर्णपणे विकासकामांवर खर्च करण्यात आला आहे.

सन २०१६-१७ करीता सदर योजनेंतर्गत रुपये १.१० कोटी निधी मंडणगड नगरपंचायतीला मंजूर असून त्या अंतर्गत मंजूर कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कामांचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

सन २०१६-१७ मधील मंजूर असलेली कामे प्रगतीपथावर असून संपूर्ण निधी माहे मार्च, २०१८ अखेर खर्च करण्याचे नगरपंचायतीचे नियोजन आहे.

(३), (४) व (५) स्थानिक नगरसेवकांनी दिनांक २८/१२/२०१७ रोजी नगरपंचायत कार्यालयाला टाळे लावले होते, हे खरे आहे.

तथापि, प्रभारी मुख्याधिकारी यांनी ते त्यांच्या मुळ कार्यभारातील कामात व्यस्त असल्याने दिनांक २८/१२/२०१७ रोजीच्या विशेष सभेला उपस्थित राहू शकत नसल्याबाबत नगरपरिषदेस कळविल्याचे निदर्शनास आल्यानंतर, स्थानिक नगरसेवकांनी सदरचा प्रकार हा गैरसमजुतीने झाल्याचे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविले.

मंडणगड नगरपंचायत मुख्याधिकारी पदावर परिविक्षाधीन प्रक्षिणार्थीची On field Training स्वरुपात नियुक्ती केलेली आहे.

तथापि, नियुक्त मुख्याधिकारी यांच्या वैद्यकीय कारणास्तव अनुपस्थितीमुळे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्याधिकारी, खेड नगरपरिषद यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

मंडणगड नगरपंचायतीचा सुधारित आकृतीबंध दिनांक १२/०२/२०१८ रोजी मंजूर झाला आहे. त्यानुसार स्थापत्य अभियांत्रिकी श्रेणी “ब” चे एक पद तेथे मंजूर आहे.

स्थापत्य अभियांत्रिकी (राज्य) संवर्गातील पदभरतीच्या अनुषंगाने नगरपरिषद संचालनालयस्तरावर कार्यवाही सुरु असून पदभरती प्रक्रियेअंती मंडणगड नगरपंचायतीकरीता कायमस्वरुपी अभियंत्याची नियुक्ती प्राथम्याने करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड येथील नागरिकांची आर्थिक लाभ देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

**(३६) * ४०६७० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील बीटकॉईन कंपनीत गुंतवणूक केल्यास दीड वर्षात मोठा आर्थिक लाभ देण्याचे आमिष दाखवून अनेकांची फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरुध्द विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी विमानतळ पोलीस स्टेशन, नांदेड येथे ४ आरोपींविरुध्द गु.र.नं.२०/२०१८ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, २०१, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(D) अन्वये दिनांक २४/०१/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात १ आरोपीस दिनांक २४/०१/२०१८ रोजी अटक करुन दिनांक २६/०१/२०१८ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. अटक आरोपी हा जामिनावर असून उर्वरित आरोपी अटक करणे व गुन्ह्यात अधिक पुरावा हस्तगत करण्यावर तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## सिडकोच्या अधिकाऱ्यांच्या अवैध संपत्तीची चौकशी करण्याबाबत

**(३७) * ४०८७३ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोच्या अधिकाऱ्यांच्या अवैध संपत्तीची चौकशी करण्यात यावी अशी मागणी पनवेलच्या स्थानिक प्रकल्पग्रस्त संस्थेने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नवी मुंबई यांचेमार्फत चौकशी सुरू आहे.

-----------------

## मालाड (पश्चिम), मुंबई येथे खारफुटीची तोड होत असल्याबाबत

**(३८) * ३८६३९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पश्चिम), मुंबई येथे मीठ चौकीजवळ वसलेल्या गणेशनगर भागात रोज रात्री कचरा जाळण्याचे काम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा कचरा जाळण्याबरोबरच हळुहळू तेथील खारफुटीही जाळून नष्ट करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परिसरातील हवेची गुणवत्ता अनेकदा वाईट ते अतिशय वाईट दर्जाची होत असून याबाबत वारंवार तक्रार करूनही याकडे महापालिकेचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे कचऱ्याच्या नावाखाली खारफुटीची तोड करणाऱ्यांवर शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मालाड पश्चिम येथील गणेशनगर भागातील झोपडयांमध्ये काही ठिकाणी तांब्याच्या वायर जाळून तांबे वेगळे करण्याचे काम सुरु होते ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर ठिकाणी खारफुटी नाही.
(३) व (४) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली/येत आहे:-

- सदर ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
- तांब्याच्या वायर जाळण्याचे प्रकार होत असलेल्या झोपडया तोडण्यात आल्या आहेत.
- सदर परिसर निरीक्षणाखाली ठेवण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शरद इंटरप्रायजेस या कंपनीच्या मालकाने बोगस कागदपत्रे सादर करुन म्हाडाची फसवणूक केल्याबाबत

**(३९) * ३८३३८ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.अनिल परब, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इमारतीची दुरुस्ती व देखभालीची बोगस कागदपत्रे सादर करुन म्हाडाची सुमारे ६१ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शरद इंटरप्रायजेस या कंपनीचा मालक मोहम्मद जावेद खान याला मुंबईतील खेरवाडी पोलिसांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधिताकडून नुकसान भरपाई घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरहू प्रकरणी आरोपीविरुध्द फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन खेरवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २८९/२०१७ कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ भा.दं.वि. अन्वये दिनांक १८/१०/१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून फसवणुक झालेल्या रुपये ६१,५६,२०३/- रक्कमेपैकी रुपये ११,६०,४००/- हस्तगत करण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## कल्याण-डोंबिवली महापालिकेने पाठविलेल्या विकास आराखड्यास मंजूरी देण्यास विलंब झाल्याबाबत

**(४०) * ३८०१० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दिनांक ५ डिसेंबर, १९९६ रोजी वा त्यासुमारास सेक्टर ३ ते ७ पर्यंतच्या भागाचा प्रारूप विकास आराखडा प्रसिध्द केला होता तो शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्यानंतर त्यास १६ वर्षे शासनाची मंजूरीच मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व फेरबदलांना मंजूरी देऊन अखेर दिनांक ४ एप्रिल, २०१२ रोजी वा त्यासुमारास म्हणजेच १६ वर्षानंतर शासनाने महानगरपालिकेच्या उक्त विकास आराखड्यास मंजुरी दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महापालिकेने पाठविलेल्या विकास आराखड्यास मंजूरी देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कल्याण-डोंबिवली शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम २६ अन्वये दिनांक ०४/१२/१९९६ रोजी प्रसिध्द केली होती व उक्त अधिनियमाच्या कलम ३० अन्वये ती शासनास दिनांक ०४/१२/१९९९ रोजी मंजूरीसाठी सादर केली होती. तथापि, बेसमॅप योग्य नसल्याने, शासनाने दिनांक ०२/०२/२००१ च्या आदेशान्वये सदर विकास योजनेस मंजूरी देण्याचे नाकारुन सदर बेसमॅप सुधारीत करुन विकास योजनेचे प्रस्ताव अचूकपणे दर्शविण्यासाठी विभागीय आयुक्त, यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीची स्थापना केली. नियोजन समितीने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. १ व २ ची विकास योजना दिनांक २५/२/२००५ रोजी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत सादर केली असता, शासनाने ती दिनांक ३/९/२००५ च्या अधिसुचनेन्वये भागश: मंजूर केली. तसेच याच अधिसुचनेद्वारे तत्कालिन उपसंचालक नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांची उर्वरीत प्रभागासाठी विकास योजना तयार करणेसाठी कलम १६२(१) अन्वये अधिकारी म्हणून नियुक्ती केली. सदर नियुक्त अधिकारी यांनी प्रभाग क्र.३, ६ व ७ ची विकास योजना दिनांक २४/१२/२००८, प्रभाग क्र.४ ची विकास योजना दिनांक ०८/१२/२००९ व प्रभाग क्र.५ ची विकास योजना दिनांक २२/०६/२०१० रोजी शासनास मंजूरीकरीता सादर केली. सदर प्रारुप विकास योजनेसंदर्भात शासन गठीत छाननी समितीची बैठक होवून, छाननी समितीच्या शिफारशींसह प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीकरीता सादर करण्यात आली व शासन मान्यतेनंतर सदर प्रभाग क्र. ३ ते ७ च्या विकास योजना मंजूरीची अधिसूचना दिनांक ०४/०४/२०१२ रोजी निर्गमित करण्यात आली आहे.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्याच्या प्रादेशिक विकास योजनेबाबत

**(४१) * ४०७५४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कोल्हापूर जिल्ह्याची प्रादेशिक विकास योजना तयार करताना यासंदर्भात आलेल्या सुमारे ६ हजार तक्रारींकडे दुर्लक्ष करुन ही योजना मंजूर केली असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना तयार करताना नेमलेल्या समितीने प्रत्यक्षात वस्तुस्थिती लक्षात न घेता सॅटेलाईट इमेजचा आधार घेत योजना तयार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचा ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांना नुकसान होणार असून विकासकामेही अडचणीत येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजना रद्द करुन नवीन वस्तुस्थितीदर्शक प्रादेशिक विकास योजना तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्याची प्रारुप प्रादेशिक योजना नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणेकामी प्रसिध्द झालेनंतर विहित मुदतीमध्ये एकूण ५३९० सूचना/आक्षेप अर्ज प्राप्त झाले होते. त्या सर्वांना प्रादेशिक नियोजन समितीसमोर सुनावणीसाठी बोलविण्यात आले असता प्रत्यक्षात ४०३७ हरकतदार सुनावणीस उपस्थित होते. यानंतर नियोजन समितीने आवश्यक त्या ठिकाणी जागा पाहणी करुन त्यांचा अहवाल नियोजन मंडळास सादर केलेनंतर नियोजन मंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार प्रारुप प्रादेशिक योजनेमध्ये रस्ते व विभाग बदलासंदर्भात एकूण ९७ बदल सुचवून प्रादेशिक नियोजन मंडळ कोल्हापूर यांनी सदर प्रादेशिक योजना मंजूरीसाठी

शासनाकडे सादर केली होती. या योजनेबाबत वैधानिक कार्यवाही पूर्ण झालेली असल्याने त्यास शासन नगरविकास विभागाकडील दिनांक ०४/०१/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूरी देण्यात आलेली आहे.

(२), व (३) प्रादेशिक योजनेतील जी गावे विकसनक्षम आहेत अशा १२४ गावांसाठी ग्रोथ सेंटरचा सविस्तर आराखडा तयार करावयाचा असल्याने त्याबाबत गावनिहाय विद्यमान वापराबाबत प्रत्यक्ष जागेवर सर्वेक्षण केलेले आहे व उर्वरित ग्रामीण क्षेत्राकरीता सॅटेलाईट ईमेजच्या आधारे विद्यमान विकास दर्शविलेला आहे. ग्रामीण क्षेत्रामध्ये विकास परवानगीसाठी गावठाणापासून लोकसंख्येवर आधारित अंतरे निश्चित करण्यात येवून त्यानुसार प्रस्तावित विकास अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. ग्रामीण भागात नवीन प्रा.यो. रस्ते प्रस्तावित नसून केवळ अस्तित्वातील रस्त्याचे रुंदीकरण प्रस्तावित करण्यात आलेले असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही.

(४) व (५) सदर प्रादेशिक योजना मंजूर झाल्यानंतर अद्यापही तक्रारीच निराकरण झाले नसल्याचा नागरिकांचा सुर असल्याने यानुषंगाने मा.मंत्री महसूल यांनी नगरविकास राज्यमंत्री यांचे उपस्थितीत संबंधितांची दिनांक २०/०२/२०१८ रोजी बैठक घेतलेली आहे. या बैठकीत अशा स्वरुपाच्या तक्रारीच्या अनुषंगाने नगरविकास विभागातील अधिकाऱ्यांची समिती गठीत करुन संबंधित नागरीकांना सूनावणी देवून मंजूर प्रादेशिक योजनेत काही बदल करावयाचे असल्यास सदर समितीने शासनास शिफारस करणेबाबत सूचित केलेले आहे. यानुषंगाने समिती गठीत करण्याची कार्यवाही शासनस्तरावर कार्यवाहीमध्ये आहे.

-----------------

## परभणी महानगरपालिकेतील विद्युत देयकामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४२) * ३८४७८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४३३ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेची विद्युत देयके इतर खाजगी व्यक्तींच्या नावे भरून कोटयवधी रूपयांचा आर्थिक गैरप्रकार केल्याची बाब माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गैरप्रकार करणारे महानगरपालिका विद्युत मंडळ मधील कर्मचारी यांचे निलंबन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेतील रक्कमेचे सनियंत्रण करणारे आयुक्त, उपायुक्त, लेखापरिक्षक व इतर जबाबदार अधिकारी-कर्मचारी यांची विभागीय चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरोधात शासनस्तरावरून कोणती कारवाई केली वा करण्यात आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) परभणी महानगरपालिका इमारत विद्युत देयकामध्ये रुपये ७९.६४ लक्ष रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.
(२) सदर गैरप्रकारास श्री.अब्दुल जावेद अब्दुल शकुर हे परभणी महानगरपालिकेमधील रोजंदारीवरील कर्मचारी हे प्रथमदर्शनी जबाबदार आढळल्याने त्यांच्या सेवा परभणी महानगरपालिकेने दिनांक १३/१२/२०१७ च्या आदेशान्वये समाप्त केल्या आहेत.

तसेच, सदर गैरव्यवहाराबाबत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेमार्फत तपास सुरु आहे.
(३) व (४) सदर गैरव्यवहाराबाबत आयुक्त, परभणी महानगरपालिका यांच्या मार्फत प्राथमिक चौकशी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(४३) * ३८३७४ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जयंत पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अधिकाऱ्यांनी शासकीय नियमांचे उल्लंघन करून आपल्या मर्जीतील मे.रेटॉक्स विकासक आणि चौरंगी विकासक तसेच अन्य कंपन्यांना कमी किंमतीत जागा उपलब्ध करुन देऊन बँक हमी नसताना कोट्यवधी रुपयांचे अग्रिम देऊन गैरव्यवहार केला असल्याचा ठपका कॅगच्या वाणिज्यिक अहवालात ठेवण्यात आला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या अटींवर या संदर्भातील परिच्छेद या अहवालातून वगळण्याची विनंती राज्य शासनाने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी किती व कोणत्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) निविदा सूचनेमध्ये बँक हमी देण्याची तरतूद नसतांना मे.रेटॉक्स विकासक कं. यांना बँक हमी देण्यात आल्याची बाब कॅगच्या अहवालामध्ये नमूद करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महालेखाकरांनी उपस्थित केलेल्या परिच्छेदांच्या अनुषंगाने जबाबदार अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत या समितीमार्फत चौकशी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-------------------

## ठाणे महानगरपालिकेच्या वर्तकनगर प्रभाग समितीने संबंधित भोगवटादार व मालकांकडून दंड वसूल केला नसल्याबाबत

**(४४) * ३८७६७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिकेच्या हद्दीमधील पाडण्यात येणाऱ्या अनधिकृत किंवा धोकादायक बांधकामाच्या तपशिलवार नोंदी ठेवण्याबरोबरच अतिक्रमणाच्या कारवाईमध्ये उचलून आणलेले साहित्य किंवा मालाच्या नोंदी महाराष्ट्र लेखासंहिता, १९७१ मधील नियम क्रमांक ११४ फॉर्म क्र. ८२ मध्ये नोंदणी ठेवणे महानगरपालिका प्रशासनावर बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे अनधिकृत किंवा धोकादायक तोडण्यात आलेल्या बांधकामाचा खर्च नियमाप्रमाणे संबंधित भोगवटादार व मालकांकडून वसूल करण्याची तरतूद देखील असताना ठाणे महानगरपालिकेच्या वर्तकनगर प्रभाग समितीने सुमारे १८ लाख रुपये दंड वसूल केला नसल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाप्रकारे कर्तव्यात कसूर करुन शासनाचे व महानगरपालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान केल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत महानगरपालिका आयुक्त, ठाणे, प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग यांचेकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेचा अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे व धोकादायक इमारती पाडण्यासाठी एकूण रुपये १४,९४,७००/- इतका खर्च झाल्याचे लेखापरिक्षणातून स्पष्ट झाले आहे.

ठाणे महानगरपालिकेने संबंधितास नोटीसा बजावून वसुलीची कार्यवाही सुरू केली असून आतापर्यंत रुपये ४,३०,६६०/- इतक्या खर्चाची वसुली केली असून उर्वरित रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

धोकादायक इमारती तोडल्यानंतर उक्त इमारत तोडण्याचा खर्च भरल्यानंतरच सदर जागेवर नव्याने बांधकाम करण्याची परवानगी ठाणे महानगरपालिकेमार्फत देण्यात येते.

(३) संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबतचे निवेदन सद्य:स्थितीत प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील टिळकनगर ते मानखुर्द रेल्वे स्थानकपरिसरात गर्दुल्ल्यांचा नागरिकांना त्रास होत असल्याबाबत

**(४५) * ३८४०७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.आनंदराव पाटील, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील टिळकनगर ते मानखुर्द रेल्वे स्थानकाच्या दरम्यान असणाऱ्या रेल्वे पटरी परिसरात मागील काही महिन्यापासून गर्दुल्ल्यांनी हैदोस घातला असल्याचे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टिळकनगर रेल्वे स्थानकाच्या आजूबाजूच्या परिसरात मोकळी जागा असल्याने त्या ठिकाणी मोठया प्रमाणात झाडे-झुडपे वाढली असून पूर्व भागात अनेक विद्यालये, शासकीय कार्यालये व पश्चिमेकडील भागात असलेल्या रेल्वे कॉलनीत राहणाऱ्या रहिवाशांना व प्रवाशांना रेल्वे पटरी ओलांडून जावे लागत असून झाडाझुडपाच्या आश्रयाला लपुन वास्तव्य करीत असलेल्या गर्दुल्ल्यांचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत असल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदरहू बातमी काही वृत्तपत्रांनी प्रसारीत केली होती. तथापि, प्रस्तुत प्रकरण खरे नसून दिनांक २९/११/२०१७ रोजी या प्रकरणी कोणताही गुन्हा किंवा घटना नोंद नाही.

(२) सदरहू ठिकाणी पोलीसांमार्फत मोबाईल व बीट मार्शल, गुन्हे प्रकटीकरण पथक, बीट स्टाफ हे पोलीस ठाणे हद्दीत गस्त करीत असतात. तसेच सदर ठिकाणी दिवसपाळी/रात्रौपाळी करीता पोलीस अमंलदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घेण्यात येत असून याठिकाणी कोबिंग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात रिंगरोड विकसित करण्याबाबत

**(४६) * ३९०२५ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतुक कोंडी थांबविण्यासाठी पीएमआरडीए मार्फत १२९ मीटर लांबीचा रिंगरोड दोन टप्प्यांमध्ये पूर्ण करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएमआरडीए ने यासाठी जायका या कंपनीकडून कर्ज घेण्याचे ठरविले असून त्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर रिंगरोडचे काम लवकर पूर्ण व्हावे म्हणून शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

तांत्रिक सल्लागाराने तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार रुपये ८,७६९/- इतक्या रकमेचे कर्ज जायका संस्थेकडून घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राधिकरणाने दिनांक २६/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे. राज्य शासनामार्फत चेअरमन, नॅशनल हायवे अथॉरीटी ऑफ इंडिया यांच्याकडे सदर रिंगरोडच्या पहिल्या टप्प्यातील एकूण ३४ कि.मी. च्या कामाकरीता येणाऱ्या रुपये २४७०/- कोटी इतक्या खर्चास मान्यतेस्तव दिनांक ७/२/२०१८ रोजी पाठविण्यात आला आहे.

(३) रिंग रोड विभाग - १ (सातारा रोड ते नगर रोड) स्वनिधीतून बांधकामासंदर्भातील निविदा प्रसिध्द करण्यात आली असून, त्यानुषंगाने एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत. दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला असून, निविदेची छाननी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु आहे. सदर प्रकल्पाच्या कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमणूकीची प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम माहे एप्रिल, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात सुरु करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाबाबत

**(४७) * ३९७३० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३४२२ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला गती देण्यासाठी या प्रकल्पासंदर्भात तीन सामंजस्य करार करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त करारांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरील विमानतळ प्रकल्पाचे काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे व त्यादृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमातनळ सार्वजनिक-खाजगी भागिदारी (पीपीपी) तत्वावर विकसित करण्यात येत आहे. शासन निर्णय दिनांक ०६/११/२०१७ नुसार नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासासाठी उच्चतम बोलीधारक मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टस प्रा.लि. यांची सवलतधारक म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. यांच्याशी खालील तीन करार करण्यात आले आहेत.

१. सवलत करारनामा
२. राज्य शासन पाठिंबा करारनामा
३. भागधारकांचा करारनामा

(३) विमानतळाची एक धावपट्टी आवश्यक सर्व सुविधांसह डिसेंबर, २०१९ पर्यंत पुर्ण होणे अभिप्रेत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिक्की गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत

**(४८) * ३९६७९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४७९ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या चिक्कीच्या गैरव्यवहाराचा तपास पूर्ण करुन त्याचा अहवाल आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने शासनास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालाचे स्वरुप काय आहे व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही. तथापि, महिला व बालविकास विभागाकडून अंगणवाडीतील विद्यार्थ्यांकरिता पुरविण्यात येणाऱ्या शिक्षणोपयोगी साहित्य, पौष्टिक आहार इत्यादीबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी पुर्ण केली आहे.

-----------------

## नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र) बरखास्त करण्याच्या निर्णयाबाबत

**(४९) * ३९१६४ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र) दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत बरखास्त करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर सुधार प्रन्यास मार्फत करण्यात येणारी विकास कामे कोण करणार आहे,
(३) असल्यास, नागपूर सुधार प्रन्यास मध्ये ५०० पेक्षा जास्त अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून त्यांचेसाठी कोणती पर्यायी व्यवस्था शासनाने केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २७/१२/२०१६ रोजीच्या बैठकीत नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर ही संस्था नागपूर सुधार प्रन्यास अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत बरखास्त करण्याचा तत्वत: निर्णय झालेला आहे.

(२), (३) व (४) मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार संक्रमणाबाबतची पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## खार (मुंबई) येथील विकासकाने गैरव्यवहार केल्याबाबत

**(५०) * ४००१८ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३१००९ ला दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी नसतानाही खार (मुंबई) येथील १६ व्या रस्त्यावर उभारलेल्या मोरदानी या आलिशान टॉवरसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा लाभ उठवून झोपडपट्टीवासियांचे चटई क्षेत्रफळ वापरले गेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात नगररचना भूखंड असताना झोपडपट्टी पुनर्वसन योजना करून वाढीव चटई क्षेत्रफळ मिळविण्यात आल्याचे प्रकरण पहिल्यांदा निदर्शनास आल्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मोरदानी रिएल्टीच्या खुल्या बाजारातील सदनिका विक्रीवर स्थगिती दिली असली तरीही झोपडपट्टीवासियांसाठी सदनिका बांधून न दिल्याप्रकरणी प्राधिकरणाने चौकशी केली असता अनेक बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टी नसतानाही झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवून प्रकल्पग्रस्तांसाठी १७ सदनिका, बालवाडी, कल्याण केंद्र तसेच सोसायटीचे कार्यालय बांधण्याऐवजी त्याजागी डयुप्लेक्स आलिशान सदनिका बांधल्याचे तपासणीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची फसवणूक केल्याप्रकरणी मे.मोरदानी रिएल्टीचे विकासक आणि संचालकांविरुद्ध खार पोलीस ठाण्यात माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल केला असला तरीही या बनावट योजनेला मंजूरी देणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील संबंधित अभियंत्याची/अधिकारी यांची नावे या गुन्हयात दाखल करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बनावट योजनेला मंजुरी देणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अभियंत्यांवर व संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१), (२) व (३) सदरची योजना बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३(१०) अंतर्गत 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' नसून विनियम ३३(१४) अंतर्गत मोकळ्या भूखंडावर कायम स्वरुपी संक्रमण गाळे (PTC) बांधून देण्याबाबतची योजना आहे. खार, मुंबई येथील १७ PTC सदनिकांसह एकूण २२४ PTC+६ सुविधा सदनिकांबाबत, ५ योजनांच्या एकत्रिकरणाशी संबंधित सदर बाब आहे.

सदर योजनेमध्ये विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३(१४) अन्वये विकासकाने खाजगी भूखंडावर कायमस्वरुपी संक्रमण गाळे विहित कालावधीत बांधून देण्याच्या अटीची पूर्तता न केल्याने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत विकासकावर कारवाई करण्यात येत आहे.
(४) व (५) प्राधिकरणस्तरावर देण्यात आलेल्या मंजूरीची पडताळणी करण्याच्या सूचना प्राधिकरणास देण्यात आलेल्या आहेत.

विकासकाने कायमस्वरुपी संक्रमण गाळे विहित कालावधीत बांधून देण्याच्या अटीची पूर्तता न केल्याने विकासक व वास्तुविशारद यांच्यावर दिनांक १८/०७/२०१७ रोजी क्र.८१/१७ अन्वये MRTP अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने गुन्हा दाखल केला आहे. तसेच शासनाने दिनांक ०५/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्देशानुसार विकासक मे.मोरदानी यांच्यावर खार पोलीस स्टेशन येथे दिनांक २०/११/२०१७ रोजी क्र.४५५/१७ आय.पी.सी. कलम ४२०, ३४ अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, पोलीस खात्यामार्फत चौकशी चालू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(५१) * ३९२०३ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या विभागातील विशेष दुरुस्ती व चालु दुरुस्तीची माहे मार्च, २०१७ ते जून, २०१७ पर्यंत ९२६ बनावट देयके तयार करून कोट्यवधी रुपयांच्या निधीत गैरव्यवहार केला असून सदर प्रकरणी श्री.भरत गुर्जर यांनी मंडळाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर ९२६ देयकांची चौकशी करण्यासाठी मुख्य अधिकारी, पुणे मंडळ व श्री.के.एल.काटवटे, कार्यकारी अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण कक्ष/प्राधिकरण यांची व्दिसदस्यीय समिती उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांचे आदेश क्र.प्राधि/खाचौ/२०१७/३६९५/प्र-९, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ अन्वये स्थापन करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल अप्राप्त असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील प्रलंबित प्रकरणांबाबत

**(५२) * ३७७६५ ॲड.अनिल परब, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रामनिवास सिंह, श्री.विक्रम काळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दाखल झालेल्या विविध प्रकरणांपैकी सुमारे २०० प्रकरणांची चौकशी गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असून फक्त २५ प्रकरणांत दोषींना शिक्षा झालेली असून अन्य प्रकरणातील १६० जणांची निर्दोष मुक्तता झाल्याचे माहितीच्या अधिकारात माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी २ हजार ४८४ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी फक्त ४३ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले असून उर्वरित २ हजार ४४१ प्रकरणे बंद करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दाखल होत असलेल्या तक्रारींची संख्या लक्षात घेता दोषींवर त्वरित कारवाई होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राज्यात मागील चार वर्षात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे भ्रष्टाचारासंदर्भात एकूण ४५३६ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ३७३५ एवढ्या गुन्ह्यांमध्ये मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. उर्वरीत ४४२ गुन्हे तपासावर प्रलंबित आहे. ३३७ गुन्ह्यामध्ये दोषसिध्दी झाली असून १२४५ गुन्ह्यांमध्ये आरोपींना मा.न्यायालयाने दोषमुक्त केले आहे.

(३) व (४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त सर्व तक्रारींवर प्रचलित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही केली जाते. त्यानुसार राज्यातील मागील चार वर्षात २८,३६४ प्राप्त तक्रारींवर कार्यवाही करण्यात आली असून त्यापैकी २०,०८२ तक्रारी निर्गती करण्यात आल्या आहेत. सदर प्राप्त तक्रारीपैकी एकूण ४५३६ एवढ्या प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले असून प्रलंबित तक्रारी निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

--------------------

## ठाणे येथील कोठारी कंपाऊंड मधील पब व हुक्का पार्लर अग्निशमन परवाना न घेता सुरु असल्याबाबत

**(५३) * ३८०८८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कोठारी कंपाऊंड मधील पब व हुक्का पार्लर अग्निशमन परवाना न घेता अनेक वर्षांपासून सुरु असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ठाणे महानगरपालिकेत अनेक वेळा मासिक सभेत हरकत घेतली असतानाही कारवाई न होता राजकीय दबावापोटी सदर पब व हुक्का पार्लर सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाशी संबंधित असलेल्या महानगरपालिका अधिकारी, अग्निशमन अधिकारी, पोलीस अधिकारी तसेच राजकीय नेत्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मात्र या ठिकाणी ५ बार व रेस्टॉरन्ट अग्निशमन परवाना न घेता सुरू असल्याचे सप्टेंबर, २०१७ दरम्यान निदर्शनास आले.

(२) हे खरे नाही.

(३) ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने सप्टेंबर, २०१७ पासून ठाणे शहरातील ४२६ आस्थापनांची तपासणी केली असता त्यांचेकडे अग्निशमन ना-हरकत दाखला नसल्याचे आढळून आले. त्यांच्याविरुध्द नियमानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

- उर्वरीत आस्थापनांची तपासणी सुरू आहे.
- कोठारी कंपाऊंडमधील ५ बार व रेस्टॉरन्ट अग्निशमन परवाना नसल्याने महानगरपालिकेमार्फत बंद करण्यात आले होते.

- तद्नंतर संबंधित आस्थापनांच्या विनंतीनुसार अग्नि प्रतिबंधक सुरक्षा उपाययोजनांची पूर्तता करण्याच्या अटीच्या अधीन सदर बार व रेस्टॉरन्ट उघडून देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण अधिकाऱ्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी करण्याबाबत

**(५४) * ३८८९७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरानगर जोगेश्वरी एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित मौज मजास जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-६० या संस्थेचे परिशिष्ट-२ तयार करताना झोपडपट्टीधारकांनी सादर केलेले पुरावे बोगस असून त्यांची मागणी केल्यानंतर महिती आयुक्तांना सदर झोपडपट्टीधारकांची २०८ प्रतिज्ञापत्रे व खरेदीखते गहाळ किंवा नष्ट झाले असे प्रतिज्ञापत्र झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकारणाने दिले त्यासंदर्भात चौकशी करावी आणि गुन्हे दाखल करावे असे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तसेच सभासद श्री.सुरेश रघुनाथ गायकवाड यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस महासंचालक यांना दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) इंदिरानगर जोगेश्वरी एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित मौजे मजास जोगेश्वरी (पुर्व), मुंबई-६० या संस्थेच्या सदनिका वाटपात भ्रष्टाचार झाला असल्याबाबत श्री.सुदेश रघुनाथ गायकवाड यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस महासंचालक यांना

दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी निवेदन दिले आहे. त्यासोबत श्रीमती विद्या चव्हाण, विधानपरिषद सदस्य यांनी यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या दिनांक ६/९/२०१७ रोजीच्या निवेदनाची छायांकित प्रत जोडली आहे.
(२) व (३) श्रीमती विद्या चव्हाण, विधानपरिषद सदस्य यांचा याच विषयावरील दिनांक १/१२/२०१६ रोजीचा तक्रार अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राप्त झाला असून सदरचा अर्ज गृहनिर्माण विभागाच्या उच्चस्तरीय समितीकडे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. तसेच श्री.सुदेश रघुनाथ गायकवाड यांच्या दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजीच्या अर्जाबाबत तपासणी करण्यात येत आहे.

-----------------

## नाशिक एमआयडीसीतील बॉश कंपनीमधील कोट्यवधी रुपयांच्या स्पेअरपार्ट चोरी प्रकरणाबाबत

**(५५) * ३९३६७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक एमआयडीसीतील बॉश कंपनीमधील कोट्यवधी रुपयांच्या स्पेअरपार्ट चोरी प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणीबाबत अंबड पोलीस ठाणे, येथे गुरनं ०४/२०१८ भादंविक. ३८०, ३८१, ४०९, ४२०, ४६५, ४६८ ४७१, ४११, ३४ सह कलम कॉपीराईट १९५७ चे कलम ५१ व ६३ (अ), (ब) अन्वये दिनांक ०४/०१/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात १० आरोपी अटक करण्यात आले असून

१ विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच सदर गुन्ह्यात ०३ आरोपी फरार आहेत. सदर गुन्ह्यात एकूण रुपये १०,७५,१४,६०१/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सातपुर पोलीस ठाणे येथे गुरनं २२/२०१८ भादंविक. ३८०, ३४ अन्वये दिनांक २६/०१/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपीतांना अटक करण्यात आलेली असून एकूण रुपये १०,५९,२२५/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सीआयडी चौकशीच्या मागणी अनुषंगाने प्राप्त निवेदनावर कार्यवाही सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईमध्ये धोकादायक चायना व्हाईट या अंमलीपदार्थाची तस्करी होत असल्याबाबत

**(५६) * ३८३८० ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये धोकादायक चायना व्हाईट या अंमलीपदार्थाची तस्करी होत असल्याबाबतची माहिती बृहन्मंबई अंमलीपदार्थ विरोधी पथकाला माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मिळाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार किती तस्करांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई येथे चायना व्हाईट जप्त केलेबाबत कोणताही गुन्हा दाखल नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील मुंढवा आणि मगरपट्टा या उपनगरांना जोडणाऱ्या रेल्वे उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५७) * ३८७८८ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील मुंढवा आणि मगरपट्टा या उपनगरांना जोडणाऱ्या रेल्वे उड्डाणपुलाचे काम पूर्ण न झाल्याने नागरीकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त रेल्वे उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंढवा येथे पुणे-सोलापूर रेल्वे लाईनवर रेल्वे ओलांडणी पुल बांधण्याचे काम पुणे महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

या कामाचे कार्यादेश दिनांक २१/१/२०१५ रोजी देण्यात आले आहेत.

या कामाकरीता आवश्यक असलेली जागा उपलब्ध न होणे, सदर कामासाठी अडथळा ठरणाऱ्या बाबींचे स्थलांतर करण्यासाठी संबंधित विभागांची संमती घेणे, रेल्वे विभागाची मान्यता घेणे, इ. कामांमुळे प्रस्तुत पुलाच्या कामास विलंब झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सद्य:स्थितीत पुलाचे काम ८०% पूर्ण झाले असून मे २०१८, अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याबाबत

**(५८) * ३९१४६ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महापालिकेने मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार मागील एक महिन्यापासून सुमारे साडेचार कोटी रुपये

खर्च करुन शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची मोहीम राबविली असल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील निम्म्या रस्त्यांवर अजूनही खड्डे असून काम निकृष्ट झाले आहे व सदर काम सुरु असताना महापालिकेचा एकही अधिकारी येथे पहाणी करण्यासाठी आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या निकृष्ट कामांची शासनाने चौकशी करुन कंत्राटदार व महापालिकेच्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) औरंगाबाद महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार शहरातील विविध रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे अंदाजे रुपये ९.०० कोटीचे काम हाती घेण्यात आले आहे.

(२) व (३) औरंगाबाद शहरातील नऊ प्रभागांतर्गत विविध ठिकाणावरील एकूण २३ कामे हाती घेण्यात आली होती. त्यापैकी १२ कामे निविदा कार्यवाही/ निविदा मंजूरी/ कार्यादेश इ. प्रशासकीय कार्यवाही अंतर्गत असून उर्वरित ११ कामे सुमारे ७५% पूर्ण झाली आहेत.

सदर कामे महापालिकेच्या अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली/ होत आहेत.

सदर कामे गुणवत्ता व दर्जा राखून करण्यात आलेली असून काही कामांची अभियांत्रिकी महाविद्यालय या त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यात आली आहे. असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील गावांना गावठाण दर्जा देण्याबाबत

**(५९) * ३९०४३ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील जांभिवली, ठाकुरपाडा, फणसीपाडा (प), अंबरनाथ पाडा, अंबरनाथ गाव व पालेगाव या गावांना गावठाण असे संबोधित करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांना गावठाण दर्जा प्राप्त न झाल्यामुळे रहिवाश्यांना १.५ चटई क्षेत्राचा लाभ होत नसल्याने त्यांना गावठाण घोषित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांस निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर गावांना गावठाण दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंबरनाथ नगरपरिषद हद्दीमधील जांभिवली, ठाकूरपाडा, फणसीपाडा, अंबरनाथ गांव व पालेगांव हा भाग अंबरनाथ-कुळगांव आणि परिसर अधिसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट आहे. सदर अधिसूचित क्षेत्राची प्रारुप विकास योजना ही त्यावेळेच्या उपलब्ध भूमी अभिलेख/गांव नकाशावरुन तयार करण्यात आली आहे. सदर गावाचे त्यावेळेच्या उपलब्ध गांव नकाशानुसार सदरचे क्षेत्र पाडा म्हणून दर्शविण्यात आलेले असल्याने सदरचे क्षेत्र मंजूर विकास योजनेत पाडा म्हणून दर्शविण्यात आले आहेत.

(२) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर गावांना गांवठाणाचा दर्जा देवून, सदरची गांवठाणे मंजूर विकास योजनेमध्ये दर्शविण्याची विनंती मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १०/८/२०१६ च्या पत्रान्वये केली आहे.

(३) मा.लोकप्रतिनिधी यांचे विनंती अर्जाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी मा.राज्यमंत्री, नगरविकास यांचेकडे दिनांक ०२/११/२०१७ रोजी सर्व संबधिताची बैठक पार पडली असून, सदर बैठकीमध्ये मा.राज्यमंत्री, नगरविकास यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर जागांची मोजणी करुन मोजणी नकाशे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी अंबरनाथ नगरपरिषदेमार्फत मुंबई महानगर

प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविले आहेत. सदर प्रकरणी पुढील कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नागपाडा येथील झिया इमारतीच्या तळमजल्यावरील रासायनिक गोदामाला आग लागून नुकसान झाल्याबाबत

**(६०) * ३९०५३ श्री.जनार्दन चांदूरकर** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नागपाडा येथील झिया इमारतीच्या तळमजल्यावरील रासायनिक गोदामाला दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागून मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत मोठया प्रमाणात चिंचोळया भागातील इमारतींमध्ये रसायनांचा साठा, विदयुत उपकरणे आणि मोबाईलची उपकरणे असलेली गोदामे व दुकाने असून महापालिकेने यांना परवानगी दिल्याने अग्निसुरक्षेची बाब निदर्शनास आली असून नागरिकांच्या जिविताचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरात आगीच्या घटनांमध्ये सातत्याने जीवितहानी होत असल्याने शहरात ३४ अग्निसुरक्षा केंद्राची निर्मिती करुन यांच्या कार्यक्षेत्रातील उपहारगृहे, हॉटेल, खानावळी, रासायनिक धोकादायक घटकांच्या दुकानांची तपासणी करण्याबाबत व सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१) नागपाडा येथील झिया इमारतीच्या तळमजल्यावरील मोबाईल फोनच्या सुट्टया भागाचा साठा असलेल्या गोदामास दिनांक ०५/०१/२०१८ रोजी आग लागली होती ही वस्तुस्थिती आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील व्यावसायिक आस्थापनांमार्फत महानगरपालिकेस अर्ज प्राप्त झाल्यानंतर, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत प्रत्यक्ष पाहणी करण्यात येते.

तद्नंतर संबंधित व्यावसायिक आस्थापनांना अग्निसुरक्षेबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर आग सदोष विद्युत प्रणालीमुळे लागल्याचे आढळून आले.

मुंबई शहरात जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई अग्निशमन दलामध्ये ३४ अग्निसुरक्षा पालन कक्षाची स्थापन करण्यात आली असून, त्यानुसार उपहारगृहे, हॉटेल, खानावळी, रासायनिक धोकादायक घटकांच्या दुकानांची तपासणी करण्यात येते.

तपासणीमध्ये दोषी आढळलेल्या आस्थापनांविरुध्द मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ व महाराष्ट्र अग्निसुरक्षा व जीव संरक्षक अधिनियम, २००६ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने “ई” विभागातील ४७८ आस्थापनांची तपासणी केली असून, महानगरपालिकेमार्फत सदोष आस्थापनांविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भायखळा येथील उद्यान व प्राणी संग्रहालयाची आरक्षित जागा विकासकाच्या ताब्यात गेल्याबाबत

**(६१) * ३९७९० श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणी संग्रहालयाच्या विस्तारासाठी जिल्हाधिकारी, मुंबई यांच्याकडून ७ एकर जागा महानगरपालिकेला मिळाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र ही आरक्षित जागा विकासक मफतलालच्या ताब्यात गेली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर जागा विकासकाकडून पुन्हा ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) शासन नगरविकास विभागाकडील 'ई' वॉर्डच्या मंजूर विकास आराखडयामध्ये दिनांक १०/०२/२००४ रोजीच्या अधिसूचनेन्वये भूकर क्र. ५९३ क्षेत्र धारण करणाऱ्या जमिनीवरील वीर जिजामाता भोसले उद्यान आणि प्राणीसंग्रहालयाचा विस्तार या आरक्षणामध्ये फेरबदल मंजूर झालेला आहे. त्यानुसार निव्वळ आरक्षित क्षेत्राच्या ५० टक्के २७२८४.३६ चौ.मी. जमीन उद्यान विस्तारासाठी आरक्षित ठेवलेली असून उर्वरित ५० टक्के क्षेत्र हे धारण उपक्रम (Retention Activity) म्हणून नामनिर्देशित केलेले आहे.

सदर जमीन राज्य शासनाची असून ती मे.मफतलाल इंडस्ट्रिज यांचेकडे भाडे करारावर होती. शासनाच्या महसूल विभागाकडून उद्यान विस्तारासाठी आरक्षित असलेल्या क्षेत्राचा ताबा दिनांक ०७/०१/२०१७ रोजी महानगरपालिकेस देणेत आलेला आहे.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जागेच्या खरेदी व्यवहारात जागा मालकाने फसवणूक केल्याबाबत

**(६२) * ४०३४६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ३४६४४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीमती शितल मळेकर, रा.गिरगांव, मुंबई यांच्या फ्लॅट क्र. ११/बी, सतगुरु अपार्टमेंट, गोकुळनगर, ठाणे (प.) या जागेच्या खरेदी व्यवहारात श्री.सुनिल मारुती पळसकर (अभियंता, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका) या जागा मालकाने ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी एफआयआर घेण्यास स्थानिक पोलिसांनी १ वर्षाचा विलंब लावला असून दिनांक २८ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास एफआयआर घेण्यात आली असून यासंदर्भात पोलीस आयुक्त, ठाणे यांच्याकडे सुध्दा तक्रार अर्ज सादर केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राबोडी पोलीस स्टेशनचे संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (नियम व अपिल) अन्वये श्री.सुनिल मारुती पळसकर यांचेवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन त्यांना भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या सेवेतून विनावेतन निलंबित करून फसवणूकीत त्यांची साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरहू प्रकरणी आरोपीविरुध्द फिर्यादी यांनी राबोडी पोलीस ठाणे येथे केलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करुन चौकशीअंती फिर्यादी यांची खबर घेवून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदरहू प्रकरणात फिर्यादी यांची फसवणूक झाल्यामुळे आरोपीविरुध्द राबोडी पोलीस स्टेशन येथे दिनांक २८/०५/२०१६ रोजी गु.र.क्र. I १४३/१६ भा.दं.वि. ४२०, ४०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच, महानगरपालिकेने आरोपीविरुध्द महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली आहे.

सदर प्रकरणात आरोपीच्या पत्नीचा सहभाग दिसून न आल्याने कारवाई करण्यात आलेली नाही. सदरहू गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# मुंबईतील मिठी नदी प्रदुषणमुक्त करण्याच्या कामास विलंब होत असल्याबाबत

**(६३) * ३९२०२ श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३१५९१ ला दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदी अतिक्रमण व प्रदुषणमुक्त करुन नदीला पूर्ववत रुप प्राप्त करुन देण्याकरिता मुंबई महानगरपालिका व शासनाने १२ वर्षापूर्वी निर्णय घेऊन काम सुरु केले परंतु त्यात महानगरपालिका व शासन अपयशी ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिठी नदीचे शुध्दीकरण अपूर्ण असताना नदीच्या किनाऱ्याच्या सुशोभिकरणाच्या नावाखाली करोडो रुपयांच्या कंत्राटांना मंजुरी देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मिठी नदीला पूर्व स्वरुप प्राप्त करुन देण्याकरिता आजपर्यंत किती निधी खर्च झाला आहे,

(४) असल्यास, गत १२ वर्षे महानगरपालिकेकडून मिठी नदीला पूर्ववत करण्याच्या कामाला होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मिठी नदीच्या संवर्धनासाठी दिनांक १९/०८/२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

मिठी नदीच्या १७.८४ कि.मी. या एकूण लांबीपैकी ११.८४ कि.मी. चा भाग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असून, उर्वरित ६ कि.मी. लांबीचा भाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत येतो.

मिठी नदी प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

- टप्पा-१ अंतर्गत गाळ काढण्याचे व रुंदीकरणाचे काम पूर्ण झाले असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ३८०० व एमएमआरडीएमार्फत २६०० बाधित बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.
- टप्पा-२ अंतर्गत मिठी नदीचे उर्वरित रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षित भिंतीचे बांधकाम व सेवारस्ता इत्यादी कामे आहेत.

- कुर्ला कलिना पुल ते सी.एस.टी. पुलापर्यंतचा भाग वगळता उर्वरित नदीचे रुंदीकरण जवळपास पूर्ण करण्यात आले आहे.
- केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्राच्या सल्ल्याप्रमाणे नदीच्या खोलीकरणाचे ९५% काम पूर्ण करण्यात आले आहे.
- मिठी नदीच्या एकूण १८.९६ कि.मी. लांबीपैकी १४.३१९ कि.मी. लांबीच्या संरक्षक भिंतीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर कामामुळे नदीच्या धारण क्षमतेत दुपटीने वाढ झाली असून, पाण्याच्या वहन/विसर्ग क्षमतेत तीन पटीने वाढ झाली आहे.

(२) क्रांतीनगर व सोनापूर स्मशानभूमी परिसरातील एकूण ५३० मीटर लांबीच्या मिठी नदीलगतच्या सेवा रस्त्याच्या सुशोभिकरणाचे काम करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रुपये २.९४ कोटी इतक्या रकमेचे कंत्राट दिनांक १५/०६/२०१७ रोजी देण्यात आले असून, सदर खर्च जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करण्यात येणार आहे.

(३) मिठी नदी संवर्धन प्रकल्पाच्या टप्पा-१ अंतर्गत रुपये ६६.३८ कोटी व टप्पा-२ अंतर्गत रुपये १०९०.३० कोटी असा एकूण रुपये ११५६.६८ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे.

(४) मिठी नदीच्या काठावर अतिक्रमणे असल्यामुळे व नदीलगतच्या खाजगी जागांचे भूसंपादन करणे आवश्यक असल्यामुळे सदर कामात अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

-----------------

## अंबरनाथ एमआयडीसी परिसरात वाहते पाणी दुषित केले जात असल्याबाबत

**(६४) * ३८०१७ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री.देविदास पवार हे शनिवार दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शहरात स्वच्छतेची पाहणी दौरा करत असताना मोरिवली एमआयडीसी भागातील स्वस्तिक कंपनीजवळ

वाहत्या पाण्यात सोनू जैस्वर आणि सुबाराम जैस्वार या दोन व्यक्ती रसायनांच्या प्लास्टिक गोण्या धुवत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना अंबरनाथ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रसायनांच्या गोण्या कोणतीही प्रक्रिया न करता विकणाऱ्या कंपनी व्यवस्थापनावर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्वच औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांतून रसायनांच्या गोण्या विनाप्रक्रिया विक्री करण्याच्या विरोधात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत अंबरनाथ पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. II ९८/२०१७, भा.दं.वि. कलम २७७, २७८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दिनांक ०५/०१/२०१८ रोजी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरचा गुन्हा तपासावर आहे.
(३) सदरहू प्रकरणी अशा प्रकारच्या घटना घडल्यास तात्काळ चौकशी करुन कायद्यानुसार कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांबाबत

**(६५) * ३९७९५ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील रघुबंशी, कमला, खटाव, फिनिक्स, कोहिनूर-१ व २, पोतदार, मफतलाल १ व २, मुकेश आणि हिंदुस्तान प्रोसेस या कंपन्यांना कापड गिरण्या सुरु करण्यासाठी शासनाने नाममात्र शुल्क आकारुन जमिनी दिल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील बंद कापड गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना हक्काची घरे देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी झाली नसल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ११ गिरणी मालकांनी जमीन गिरणी कामगारांच्या घरांसाठी दिली नसल्याने या कामगारांना मुंबईत घरे मिळणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उपरोक्त कापड गिरण्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्यावर गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना हक्काची घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) महसूल व वन विभागाकडून प्राप्त माहितीनुसार मे.मफतलाल इंडस्ट्रीज (मूळ भाडेपट्टेदार दि ससून स्पिनिंग ॲन्ड विव्हिंग मिल्स कं.लि.) यांना माझगांव महसूल विभागातील भूकर क्र. ५९३ ही शासकीय मिळकत भाडेपट्ट्याने मंजूर केलेली आहे. प्रश्नात नमूद उर्वरित कापड गिरण्यांकरिता दिलेल्या जमिनी शासकीय नाहीत.
(२) मुंबईतील बंद कापड गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना हक्काची घरे देण्याचा निर्णय शासनाने घेतला हे खरे आहे. तथापि, ५८ गिरण्यांपैकी म्हाडास प्राप्त झालेल्या ३३ गिरण्यांच्या जमिनीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :

१) टप्पा १ अंतर्गत १८ गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी ६९४८ सदनिका बांधण्यात आल्या आहेत.
२) टप्पा २ अंतर्गत ८ गिरण्यांच्या जमिनीवर ६३८९ सदनिका बांधण्यात येणार आहेत. त्यापैकी ६ गिरण्यांच्या जमिनीवरील २६३४ सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित २ गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांच्या सदनिकांचे काम प्रगतीपथावर आहे.
३) १ गिरणी जमिनीचा ताबा प्राप्त झाला असून त्यावर गिरणी कामगारांसाठी योजनेचे नियोजन प्रगतीपथावर आहे.

४) ६ गिरणी जमिनींचे क्षेत्रफळ लहान असल्यामुळे त्या मुंबई महानगरपालिकेच्या वेस्टर्न इंडिया मिल येथील मनोरंजनाच्या भूखंडासोबत अदलाबदल करण्याचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेस सादर केला आहे.

(३) नगरविकास विभागाकडून प्राप्त माहितीनुसार सदरहू ११ गिरण्यांमधील इंडिया युनायटेड मिल नं. ६ येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी आरक्षित आहे. ब्रॅडबरी व रघुवंशी या दोन खाजगी मिलचे प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाहीत. उर्वरित राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडील गिरण्यांपैकी इंडिया युनायटेड मिल क्र. ४ ची जागा म्हाडास देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तथापि, शासनाकडून गिरण्या बंद करण्याची परवानगी प्राप्त झालेली नसल्यामुळे राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला नाही.

(४) मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६/१०/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत म्हाडाचा हिस्सा निश्चित न झालेल्या ११ कापडगिरण्यांच्या रेखांकनांसंदर्भात, तसेच म्हाडाचा हिस्सा निश्चित करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेने सत्वर करावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच गिरणी कामगारांसाठी जास्तीत जास्त जमीन उपलब्ध होण्यासाठी गिरण्यांच्या मोकळ्या क्षेत्राचे १/३ प्रमाणे वाटपा ऐवजी गिरण्यांच्या संपूर्ण भूखंडाचे १/३ प्रमाणे वाटप व्हावे याकरिता विनियम ५८ मध्ये सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत. यासंदर्भाने नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणारी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१अेअे) खालील सूचना दिनांक ०७/०७/२०१७ रोजी प्रसिध्द करणेत आलेला आहे. याबाबत वैधानिक कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगोला (जि.सोलापूर) येथे नवीन पोलीस स्थानक स्थापन करुन तेथील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत

**(६६) * ३८४१० श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) येथील मुख्य पोलीस स्थानकापासून घेरडी दुरक्षेत्रात ४० ते ४५ विभाग आहेत व तेथील लोकसंख्या ही ७० ते ७५ हजार आहे तसेच या पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात येणारी काही गावे दुर्गम ठिकाणी आहेत या सर्व कामाचा कार्यभार हा केवळ चार कर्मचारी व एक अधिकारी यांच्यावर असल्याने कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव नागरिकांनाही अनेक वेळा मोठया प्रमाणात आपला वेळ खर्ची करुन तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करावी लागत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागात शासनाने नवीन पोलीस स्थानक स्थापन करुन तेथील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याच्यादृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. सांगोला (जि.सोलापूर) येथील मुख्य पोलीस स्थानकापासून घेरडी दुरक्षेत्रात २२ गावे समाविष्ट असून सदर घेरडी दुरक्षेत्र येथे सद्य:स्थितीत ०१ पोलीस अधिकारी व ०६ पोलीस कर्मचारी नेमणुकीस आहेत.

(२) हे खरे नाही. सदरबाबत गैरसोय होत असल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) सद्यःस्थितीत सांगोला (जि.सोलापूर) पोलीस ठाण्यामध्ये ०७ पोलीस अधिकारी व ९६ पोलीस कर्मचारी याप्रमाणे एकूण १०३ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

सांगोला पोलीस ठाण्यासाठी मनुष्यबळ वाढविणेबाबतचा प्रस्ताव पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर केला आहे. सदरहू प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाच्या स्तरावर तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील फेरीवाल्यांसाठी धोरण आखण्याबाबत

**(६७) * ३९७३२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फेरीवाल्यांसाठी शहरातील १०२४ रस्त्यांवरील ७८ हजार ६७० जागा निश्चित करण्यात आल्या असून या जागांबाबत स्थानिकांच्या सूचना व हरकती दिनांक ३१ जानेवारी, २०१८ पर्यंत मागविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, फेरीवाल्यांच्या जागा निश्चित करण्यासाठी मागविण्यात आलेल्या हरकती व सूचनांच्या आधारे शासनाने फेरीवाल्यांसाठी नियम तयार करुन धोरण आखले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील धोरणाचा तपशील काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अनुज्ञापत्रधारक फेरीवाला वगळता १ मी. x १ मी. आकारमानापेक्षा जास्त जागा व्यापणाऱ्या फेरीवाल्यांवर तसेच पदपथ/रस्त्यांवरील दुकानांचा आणि सदनिकांचा वहिवाटीचा प्रवेशमार्ग अडवून व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई नियमितपणे पार पाडली जाते.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ४१५६ व ४१५७/२००२, दिनांक १२/०२/२००७ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २२०९७ पीचेसना (बैठया जागा) मान्यता दिलेली आहे.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत फेरीवाल्यांकरिता बैठया जागांसाठी सन २०१५ मध्ये पुन्हा सर्वेक्षण करुन, १३६६ रस्त्यांवरील ८५८९१ पीचेसची यादी दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली असून, त्याबाबत दिनांक १५/०२/२०१८ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

(३), (४) व (५) महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील सदर यादी प्राथमिक स्वरुपात असून, त्यावर नागरिकांकडून प्राप्त हरकती/सूचनांचा विचार करुन महानगरपालिकेच्या पथविक्रेता समितीमार्फत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

---------------

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(६८) * ३९२०० श्री.परिणय फुके, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७८६ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्वास पाटील यांनी जुहूतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत स्वतःच्या पत्नीला विकासकासोबत भागीदार करुन १६६१.६८ आणि १११९.५६ चौ. फूटाच्या तसेच ९२५.८० चौ.फूटाच्या टेरेससह दोन सदनिका आणि चार पार्किंगच्या जागा मिळविल्याचे प्रकरण निदर्शनास आले असून या गैरव्यवहाराबाबत गृहनिर्माण विभागाचे तत्कालीन सचिव, श्री.सिताराम कुंटे यांनी चौकशी करावी अशी मागणी मुख्य सचिव यांचेकडे सन २००९ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाबाबत अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे प्राथमिक चौकशी करण्याचे काम सोपविण्यात आले असता प्राथमिक चौकशी माहे एप्रिल, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान पूर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने केलेल्या प्राथमिक चौकशीत काय आढळून आले व सदर प्राथमिक चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे प्राथमिक चौकशी करण्याचे काम सोपविण्यात आले होते. प्राथमिक चौकशी एप्रिल, २०१२ मध्ये पूर्ण झाल्याची माहिती आहे. प्राथमिक चौकशी अहवाल उपलब्ध करुन देण्याबाबत विभागीय आयुक्त कार्यालयास विनंती करण्यात आलेली आहे. विभागीय आयुक्तांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जुन्या इमारतीच्या स्वयंपुनर्विकासासाठी एक खिडकी योजना सुरु करण्याबाबत

**(६९) * ३७७७१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील हजारो जुन्या इमारतीमधील लाखो रहिवाशांच्या स्वयंपुनर्विकासासाठी “एक खिडकी योजना” शासनाने आखली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप व निकष काय आहेत व त्याची अंमलबजावणी केंव्हापासून करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुन्या चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पांतील विकासकांची महारेरा अन्वये नोंदणी करण्याबाबत

**(७०) * ३८९०२ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांच्या विकासकांना महारेरा अन्वये नोंदणी करण्याचा नियम तयार करण्यात येणार असल्याची घोषणा करतेवेळी मा.गृहनिर्माण मंत्री यांनी दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास ज्या जुन्या चाळींचे पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित अथवा नवीन आहेत अशा प्रकल्पांना ना-हरकत प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्याच्यादृष्टीने कोणताही नियम करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जुन्या चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पांची महारेरा अन्वये नोंदणी करण्यासाठी व जुन्या चाळींचे पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित अथवा नवीन आहेत अशा प्रकल्पांना ना-हरकत प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्याच्यादृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१), (२) व (३) केंद्रिय स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ हा कायदा दिनांक २६/०३/२०१६ रोजी पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमातील कलम ३ व ४ मध्ये गृहनिर्माण प्रकल्पांबाबत अनुक्रमे विक्री तसेच नोंदणीबाबतची कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे.

तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कामाला शिस्त लागावी तसेच योजना निश्चित कालमर्यादेमध्ये पूर्ण व्हावी यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव सादर करतांना या सर्व योजना महारेराशी जोडणेबाबतच्या योजनेचे प्रारुप प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेबाबत संबंधितांना दिनांक ०२/०१/२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

-----------------

## नस्तनपूर (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथे पोलीस चौकीची निर्मिती करणेबाबत

**(७१) * ३९४४२ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नस्तनपूर (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथे भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कायमस्वरूपी पोलीस चौकीची निर्मिती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.शनिदेव मंदिर येथे येणारे भाविक व पर्यटकांच्या सुरक्षेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांचे आस्थापनेवरील नांदगाव पोलीस ठाणे अंतर्गत नस्तनपूर येथे पोलीस चौकीची निर्मिती करण्यास दिनांक ३/१/२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील मच्छरांचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत

**(७२) * ३८७९१ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात मच्छरांचा प्रादुर्भाव वाढल्याने रस्त्यावरील वाहनांचे अपघात होत असूनही पुणे महापालिकेकडे यासाठी प्रतिबंधात्मक औषध उपलब्ध नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार वाहन अपघातास कारणीभूत मच्छरांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अनियमित व दिर्घकाळ पावसामुळे त्या कालावधीत मच्छरांचा प्रादुर्भाव वाढतो ही वस्तुस्थिती आहे. तथापि, अन्य कालावधीत साधारणत: मच्छरांचा प्रादूर्भाव फारसा वाढत नाही. तथापि इतर कालावधीत चिलटांचे प्रमाण वाढते. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पुणे महानगरपालिकेच्या किटक प्रतिबंधक विभागाकडे पुरेसा किटक नाशकांचा साठा उपलब्ध असून त्याचे क्षेत्रिय कार्यालयनिहाय नियमित वाटप करण्यात येते.

मच्छरांचा प्रादूर्भाव तसेच किटकजन्य आजारांचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून खालील उपाययोजना करण्यात येतात :-

- किटकनाशक औषधांची फवारणी व धुम्र फवारणी नियमित करण्यात येते.
- महानगरपालिकेच्या स्तरावर किटकजन्य आजार व मच्छरांचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी मॉस्किटो ॲबेटमेंट कमिटी स्थापन केली आहे.

- पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात औषध फवारणी केलेल्या खाजगी मिळकतींची संख्या सुमारे ३३५३५०४ व सार्वजनिक मिळकतींची संख्या ३३०१८५ इतकी आहे. सदर औषध फवारणी नियोजनबध्द पध्दतीने राबविण्यात येते.
- पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात खाजगी ठिकाणी डास नष्ट केलेल्या डासोत्पत्तीस्थानांची संख्या ३३३४२ असून सार्वजनिक ठिकाणी डासांचा प्रादूर्भाव नष्ट केलेल्या डासोत्पत्ती स्थानांची संख्या १०४१९ इतकी आहे. तसेच सदरची कार्यवाही नियमित करण्यात येते.
- डासोत्पत्तीस कारणीभूत व्यक्ती / संस्थांना नोटीस बजावण्यात आल्या असून दोषी व्यक्तींना प्रशासकीय शुल्क आकारण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील काळबादेवी परिसरातील सुवर्णकार कारागिरांचे व्यवसाय अन्यत्र स्थलांतरित करण्याबाबत

**(७३) * ३९०७१ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काळबादेवी भागात प्रत्येक घरात सुवर्णकार कारागिरांचा व्यवसाय सुरु असून त्यासाठी भट्टया, धुरांच्या चिमण्याचा वापर केला जातो व धुराच्या प्रदुषणामुळे येथील नागरिकांच्या आरोग्याला हानी पोहचत असून भट्टयांमुळे आगीचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काळबादेवी परिसरातील नागरिकांच्या अग्निसुरक्षेच्या दृष्टिकोनातून येथील सुवर्णकार कारागिरांचे व्यवसाय अन्यत्र स्थलांतरीत करण्याची सूचना शासनाने मुंबई महापालिकेला केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने महापालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) काळबादेवी भागात "घराच्या शेजारी रसायनाचा वापर व अवैध चिमणी लावल्याबाबत" या विषयाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजीच्या मंत्रालय लोकशाही दिनामध्ये सुनावणी घेण्यात आली होती ही वस्तुस्थिती आहे.

सदर लोकशाही दिनाच्या सुनावणीवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेस खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत :-

- सदर रहिवासी भागात सुवर्णकार कारागीर व्यावसायिकांच्या असलेल्या अनधिकृत चिमण्या व अवैध रसायनांचा वापर बंद करण्यासंदर्भात गैरवापरकर्त्यांना अवैध कारखाने बंद करण्याची नियमानुसार कालावधी नमूद करुन नोटीस द्यावी.
- या प्रकरणी या भागातील सुवर्णकार कारागीरांना त्यांच्या व्यवसायाकरिता पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्तांनी संबंधितांबरोबर बैठक घेऊन त्याचा अहवाल सादर करावा.
- पुढील ३ महिन्यांच्या आत उपरोक्त कार्यवाही करावी.

तसेच, सदर प्रकरण माहे मे, २०१८ च्या मंत्रालय लोकशाही दिनामध्ये पुन्हा ठेवण्यात येणार आहे.

(३) व (४) सदर निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

- नागरिकांच्या अग्निसुरक्षेच्या दृष्टीकोनातून तयार करण्यात आलेल्या संयुक्त पथकामार्फत दिनांक ८ जानेवारी, २०१८ पासून ९४ धुरांडे निष्कासित करण्यात आले आहेत.
- ४ अनधिकृत भट्टया व १२ एक्झॉस्ट फॅन निष्कासित करुन बांधकामाचे सामान जप्त करण्यात आले आहे.

सुवर्णकार कारागीरांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देणेबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेसमवेत माहे मार्च, २०१८ मध्ये बैठक नियोजित आहे.

----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.